म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८३९

# ना - संगीत

१८३९

संपादक

**अप्पा पटवर्धन**

REFBK-0011771
REFBK-0011771

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

किंमत ७५ नये पैसे

१८३९

# प्रार्थना - संगीत

३५०२९
११·१२·६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ......................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

०१८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८०१
REFBK-0011771
REFBK-0011771

संपादक

अप्पा पटवर्धन

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

किंमत ७५ नये पैसे

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| निवेदन ... .... ... ... | १ ते २ |
| प्रार्थना ... .... ... ... | ३ ते १४ |
| सुटे मंत्र .... .... ... .... | १५ ते २१ |
| सुबोध प्रातःप्रार्थना ... .... ... .... | २२ – २३ |
| सुबोध सायंप्रार्थना .... .... .... .... | २४ |
| भजनें ( घूना ) .... .... ... ... | २५ ते २७ |
| पद्यें मराठी ... .... ... .... | २८ ते ५३ |
| पद्यें गुजराथी .... ... .... .... | ५४ ते ५६ |
| पद्यें हिंदी .... .... .... ... | ५७ ते ७६ |
| पद्य बंगाली ... .... .... .... | ७७ |
| पुरवणी पद्यें .... .... .... .... | ७८ |
| पद्यांची सूची ... ... ... ... | ७९ – ८० |

# निवेदन

संगीत हें एक वरदान आहे. संगीतामध्यें मन तल्लीन होतें; संगीतानें दुःखाचा विसर पडतो; संगीतानें मनाचे विकार व शरीराचेहि विकार शमतात. संगीताला "नादब्रह्म" म्हटलें आहे. संगीतानें पशुपक्षी सुद्धां प्रसन्न होतात; गाई अधिक दूध देतात; झाडांना फलधारणाहि अधिक होते म्हणे. संगीतानें वीरांना स्फुरण चढतें, श्रमिकांचा श्रमपरिहार होतो. एकट्या माणसाच्या सोबतीला संगीत असेल तर त्याला कधीं करमेनासें होणार नाहीं.

भक्तिपर संगीत हेंच खरें किंवा श्रेष्ठ संगीत. परमेश्वराची आराधना किंवा आळवणी हेंच संगीताचें उद्दिष्ट. या पुस्तकामध्यें असलेंच संगीत संग्रहित केलें आहे.

आश्रम व सामुदायिक प्रार्थना ही गांधीजींची देणगी आहे. गांधीयुगापासून देशभर, तशाच महाराष्ट्रभर, अनेक आश्रम, छात्रालयें इत्यादि संस्था सुरू झाल्या आहेत व तेथें सकाळ-संध्याकाळ सामुदायिक प्रार्थना होत असते. शाळांमध्यें तसेंच निरनिराळ्या संमेलनांच्या व शिबिरांच्या प्रसंगीं सुद्धां प्रार्थना करण्यांत येते. अशा प्रार्थनांसाठीं साहित्य पुरविणारें मराठी पुस्तक आजवर नव्हतें, ती गरज पुरी करण्याचा हा प्रयत्न आहे.

येथें प्रार्थनांचे श्लोक व मंत्र, गांधीजी व विनोबा यांच्या आश्रमांत व इतर कांहीं ठिकाणीं प्रचलित असलेले दिले आहेत, त्यांतून प्रत्येकानें आपल्या आवडीनुसार निवड करावी. पदें, अभंग इत्यादींची निवड मीं माझ्या स्वतःच्याच अभिरुचीनुसार केली. अर्थगांभीर्य, पदलालित्य, गोड चाल, सुबोध अर्थ इत्यादि लक्ष्यांत घेऊन निवड केली आहे. मराठी पद्यांना अर्थात्‌च प्राधान्य दिलें आहे. तुकाराम-रामदासादिकांच्या पद्यांबरोबरच आधुनिक संत तुकडोजी महाराज, साने गुरुजी व सेनापति बापट इत्यादींचींहि पद्यें दिलीं आहेत. तुकारामादिकांच्या नांवानें बनविलेलीं बनावट परंतु रसाळ पद्येंहि वर्ज्य मानलीं नाहींत. कांहीं अप्रसिद्ध पद्यकारांचीं निवडक पद्यें सुद्धां मीं या संग्रहांत सामील केलींत.

मराठी पद्यांखेरीज हिंदी, गुजराथी व ( एकच ) बंगाली पद्येंहि या संग्रहांत दिलीं आहेत. मात्र एकूण पद्यसंख्या जवळजवळ शंभर असावी अशी मर्यादा आगाऊच योजली होती.

प्रार्थनेच्या श्लोकांचे व मंत्रांचे मराठी अर्थ, व इतर भाषांतील पद्यांचा भावार्थ मराठी वाचकाला समजावा इतपत शब्दार्थ व खुलासे येथें दिले असल्यानें ही पद्यावलि मराठी भक्तिरसिकांना उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे.

पद्यांच्या चाली किंवा राग-ताल नमूद करणें मला जुळण्याजोगेंहि नव्हतें' शिवाय पद्यांच्या चाली या समक्षच ऐकाव्या लागतात, एरवीं त्या नीट समजत नाहींत व त्यांची पूर्ण गोडी चाखतां येत नाहीं. हा संग्रह माझा वैयक्तिक संग्रहच आहे आणि ज्या पद्यांची चाल व बहुतांशीं अर्थ मला स्वतःला कळले अशींच पद्यें मीं येथें दिलीं आहेत. त्यामुळें त्यांच्या चाली समक्ष दाखवून देण्याची माझी तयारी आहे. कारण या पुस्तकाचा प्रचार मुख्यतः माझ्या पदयात्रेमध्येंच व्हावा अशी कल्पना आहे.

पदयात्रा<br>
मु. मंगळवेढें<br>
ता. ३१-५-६१

अप्पा पटवर्धन

# प्रार्थना–संगीत शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पॅरा | ओळ | अशुद्ध | शुद्ध ( किंवा खुलासा ) |
|---|---|---|---|---|
| १४ | १७ | १ | लीन | विलीन |
| ,, | १८ | ४ | तुला .... आहोंत | ( तेंच वाक्य पुन्हां पाहिजे ) |
| १६ | १ | ५ | नस्तईम | नस्तईन |
| १७ | १ | १ | मनदा | मजदा |
| २४ | ५ | ३–४ | | ( आधीं ब्रह्म मज्द व नंतर रुद्र विष्णु ) |
| २७ | २६ | | | ( २६ आंकडा गाळावा व खालच्या १७ ऐवजीं २६ घालावा. ) |
| २८ | २ | ५ | अन्तर्ब्राह्य | अंतर्बाह्य |
| ,, | ३ | ४ | राघवाचे | विठ्ठलाचे |
| ३७ | ३२ | ७ | आतां | खातां |
| ४० | १ | ५ | सोसावी | गोसावी |
| ४९ | १ | ३ | तुझ्या | तुझा |
| ५४ | ६५ | शेवटची | एकोत्तरे | एकोत्तेर |
| ५५ | ६६ | २ | लोटुं | लोढुं |
| ,, | ,, | ३ | अरची | खरची |
| ,, | ,, | ११ | जूटी | खूटी |
| ५६ | ६८ | ७ | मीराकडे | मीरा कहे |
| ६० | ७७ | १ | कुकर | कुवर |
| ६४ | ८४ | १० | ठोर | ठौर |
| ६८ | ९१ | ३ | सूखा सूखा | सूखा रूखा |
| ७५ | १०४ | १ | उगम | अगम |
| ,, | ,, | ११ | चोटीको | चीटीको |
| ७७ | १०६ | ८ | पडो | पड्यो |

# प्रार्थना - संगीत

# प्रार्थना

## प्रातःस्मरण

१ प्रातः स्वरामि हृदि संस्फुरद् आत्मतत्त्वम्
सच्चित्सुखं परमहंसगतिं तुरीयम् ।
यत् स्वप्नजागर सुषुप्तम् अवैति नित्यम्
तद् ब्रह्म निष्कलम् अहं न च भूतसंघः ॥

२ प्रातर् भजामि मनसो वचसाम् अगम्यम्
वाचो विभान्ति निखिला यदनुग्रहेण ।
यन् नेति नेति वचनैर् निगमा अवोचुस्
तं देवदेवम् अजम् अच्युतम् आहुर अग्र्यम् ॥

३ प्रातर् नमामि तमसः परम् अर्कवर्णम्
पूर्णं सनातनपदं पुरुषोत्तमाख्यम् ।
यस्मिन्निदं जगद् अशेषम् अशेषमूर्तौ
रज्ज्वां भुजंगम इव प्रतिभासितं वै ॥

४ समुद्र-वसने देवि पर्वत-स्तन-मंडले ।
विष्णु-पत्नि नमस् तुभ्यं पाद-स्पर्शं क्षमस्व मे ।

५ या कुन्देन्दु-तुषार-हार-धवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणा-वर-दंड-मंडित-करा या श्वेत-पद्मासना ।
या ब्रह्माच्युत-शंकर-प्रभृतिभिर् देवैः सदा वंदिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥

६ वक्रतुंड, महाकाय, सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव, शुभकार्येषु सर्वदा ॥

७ गुरुर् ब्रह्मा गुरुर् विष्णुर् गुरुर् देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।

मराठी ग्रंथ संग्रहालय (ठाणे) स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ ..................
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११७७९

# प्रार्थना

## अर्थ

१. हृदयांत स्फुरणाऱ्या आत्मतत्त्वाचें प्रातःकालीं स्मरण करतों, जें आत्मतत्त्व सत्–चित्–सुख–मय, परमहंस योग्यांना प्राप्त होणारें व चतुर्थ अवस्थारूप आहे, जें स्वप्न, जागृति व निद्रा या अवस्थांना नित्य जाणतें, तें शुद्ध ब्रह्म मी आहें; मी पंचमहाभूतांचा समूह नव्हे.

२. मन व वाणी यांना अगम्य असणाऱ्या, ज्याच्या कृपेनें सर्व प्रकारची वाणी प्रकट होते, वेद ज्याचें वर्णन 'असें नव्हे, असें नव्हे' शब्दांनीं करतो, त्या आत्मतत्त्वाचें मी पहाटे भजन करतों. त्याला देवांचा देव, अजन्मा, च्युत न होणारा, सर्वांच्या आधींचा म्हणतात.

३. अंधारापलीकडील, सूर्यासारखी कांति असलेल्या, पूर्ण, पुरुषोत्तम नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या सनातन पदाला पहाटेच्या वेळीं नमन करतों, कीं ज्या विश्व–मूर्तींमध्यें हें सारें जग दोरीच्या ठायीं सर्प त्याप्रमाणें भासमान् झालें आहे.

४. हे पृथ्वी देवी, समुद्र जिचें वस्त्र, पर्वत हे जिचे स्तन, जी विष्णूची पत्नी त्या तुला नमस्कार असो. माझे पाय लागल्याबद्दल क्षमा कर.

५. जी कुंद ( फूल ) चंद्र, बर्फ यांच्या हाराप्रमाणें शुभ्र आहे, जिचें वस्त्र शुभ्र आहे, जिचा हात वीण्याच्या सुंदर दंडानें सुशोभित आहे, जी श्वेत कमलावर बसलेली आहे, जिला ब्रह्मा, अच्युत, शंकर प्रभृति देव नित्य वंदितात ती जडतेचा संपूर्ण नाश करणारी भगवती सरस्वती माझें रक्षण करो.

६. वांकड्या तोंडाच्या, विशाल शरीराच्या कोट्यवधि सूर्यांचें तेज असलेल्या देवा, शुभ कामांमध्यें तूं माझीं विघ्नें दूर कर.

७. गुरु ब्रह्मा–विष्णु–महेश्वर आहे, गुरु साक्षात् परब्रह्म आहे. त्या श्रीगुरूला नमस्कार.

## प्रातःस्मरण

८ शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम्
विश्वाधारं गगन-सदृशं मेघवर्णं शुभांगम् ।
लक्ष्मीकांतं कमल-नयनं योगिभिर् ध्यानगम्यम्
वंदे विष्णुं भवभयहरं सर्व-लोकैकनाथम् ॥

९ कर-चरण-कृतं वाक्-कायजं कर्मजं वा ।
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विहितम् अविहितं वा सर्वम् एतत् क्षमस्व
जयजय करुणाब्धे श्री महादेव शंभो ॥

१० न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् ।
कामये दुःख-तप्तानां प्राणिनाम् आर्ति-नाशनम् ॥

११ स्वस्ति प्रजाभ्यः, परिपालयंताम्
न्याय्येन मार्गेण महीं महीशाः ।
गोब्राह्मणेभ्यः शुभम् अस्तु नित्यम्
लोकाः समस्ताः सुखिनो भवंतु ॥

१२ नमस्ते सते ते जगत्-कारणाय
नमस्ते चिते सर्व-लोकाश्रयाय ।
नमोऽद्वैततत्त्वाय मुक्तिप्रदाय
नमो ब्रह्मणे व्यापिने शाश्वताय ॥

१३ त्वम् एकं शरण्यं त्वम् एकं वरेण्यम्
त्वम् एकं जगत्पालकं स्व-प्रकाशम् ।
त्वम् एकं जगत्-कर्तृ-पातृ-प्रहर्तृ
त्वम् एकं परं निश्चलं निर्विकल्पम् ॥

# अर्थ

८. शांत मुद्रा असलेल्या, सर्पावर पहुडलेल्या, बेंबींतून कमल निघालेल्या, देवांचा स्वामी व विश्वाचा आधार असलेल्या, आकाशाप्रमाणें ( अलिप्त ) असणाऱ्या, मेघाच्या वर्णाच्या, ज्याचीं गात्रें शोभिवंत आहेत अशा, कमळासारखे डोळे असलेल्या, योग्यांना ध्यानाच्या द्वारा आकलन होणाऱ्या, संसार–भय दूर करणाऱ्या, सर्व जगताच्या एकमेव स्वामी, लक्ष्मीपति विष्णूला मी वंदन करतों.

९. हातांपायांनीं केलेले, वाणी वा शरीराकडून घडलेले कानांडोळ्यांनीं किंवा मनानें होणारे, प्रत्यक्ष घडलेले वा न घडलेले असे सारे अपराध हे करुणासागर श्री महादेव शंभो, तूं पोटांत घाल.

१०. नको राज्य, नको स्वर्ग, नको पुनर्जन्मापासून सुटका. दुःखानें पीडलेल्या प्राण्यांचीं दुःखें दूर व्हावीं एवढीच इच्छा.

११. प्रजेचें कल्याण असो. राजेलोक पृथ्वीचें न्यायानें रक्षण करोत. गो–ब्राह्मणांचें नित्य भलें होवो. समस्त लोक सुखी होवोत.

१२. सत्स्वरूप जगत्कर्त्या तुला नमस्कार. सर्व विश्वाला आधाररूप चैतन्या तुला नमस्कार. मुक्तिदात्या अद्वैततत्त्वाला नमस्कार. सर्वव्यापी शाश्वत ब्रह्माला नमस्कार.

१३. तूंच एक आसरा आहेस, तूंच इच्छिण्याजोगा आहेस. तूंच एक जगाचा पालनकर्ता व स्वयंप्रकाश आहेस. तूंच या जगाचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ता आहेस. तूंच एक श्रेष्ठ, निश्चळ व निर्विकल्प आहेस.

## प्रातःस्मरण

१४ भयानां भयं, भीषणं भीषणानाम्
गतिः प्राणिनां पावनं पावनानाम् ।
महोच्चैः पदानां नियंतृ त्वम् एकम्
परेषां परं रक्षणं रक्षणानाम् ॥

१५ वयं त्वां स्मरामो वयं त्वां भजामो
वयं त्वां जगत्-साक्षिरूपं नमामः ।
सद् एकं निधानं निरालंबम् ईशम्
भवाम्भोधि-पोतं शरण्यं व्रजामः ॥

## अर्थ

१४. तूं भयांचें भय आहेस, भीषणांचा भीषण आहेस. प्राण्यांची गति, पावन वस्तूंना पवित्र करणारा तूं आहेस. महान् उच्च स्थानांचें नियंत्रण करणारा तूंच एक आहेस. तूं श्रेष्ठांत श्रेष्ठ आहेस, रक्षकांचा रक्षक आहेस.

१५. आम्ही तुझें स्मरण करतों, आम्ही तुला भजतों, आम्ही जगताच्या साक्षीरूप तुला नमस्कार करतों. सत्स्वरूप, एकमात्र निधान, ज्याला अन्य आलंबनाची जरूरी नाहीं, जगाचा धनी; भवसागरांतील नौका अशा तुला आम्ही शरण जातों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम .................... दिः ..................
क्रमांक .................... नोंः दिः ..................

## सायंप्रार्थना

यं ब्रह्मावरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैर्
वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर् गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेनमनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यांतं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

## स्थितप्रज्ञ लक्षणें

अर्जुन उवाच

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ १ ॥

श्री भगवान् उवाच

प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ २ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर् मुनिरुच्यते ॥ ३ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस् तत् तत् प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ४ ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस् तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५ ॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ६ ॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥ ७ ॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ८ ॥

यं ब्रह्मावरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैर्
वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर् गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेनमनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यांतं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

## स्थितप्रज्ञ लक्षणें

अर्जुन म्हणाला

स्थिरावला समाधींत स्थितप्रज्ञ कसा असे
कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा ॥ १ ॥

श्री भगवान् म्हणाले

कामना अंतरांतील सर्व सोडूनि जो स्वयें ।
आत्म्यांतचि असे तुष्ट तो स्थितप्रज्ञ बोलिला ॥ २ ॥

नसे दुःखांत उद्वेग सुखाची लालसा नसे ।
नसे तृष्णा-भय-क्रोध तो स्थितप्रज्ञ संयमी ॥ ३ ॥

सर्वत्र जो अनासक्त बरें वाईट लाभतां ।
न उल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली ॥ ४ ॥

घेई ओढूनि संपूर्ण विषयांतूनि इंद्रियें ।
जसा कासव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ॥ ५ ॥

निराहारबळें बाह्य सोडी विषय साधक ।
आंतील न सुटे गोडी ती जळे आत्मदर्शनें ॥ ६ ॥

करीत असतां यत्न ज्ञात्याच्याहि मनास ही ।
नेती खेंचूनि वेगानें इंद्रियें दांडगींच कीं ॥ ७ ॥

त्यांस रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण ।
इंद्रियें जिंकिलीं ज्यानें त्याची प्रज्ञा स्थिरावली ॥ ८ ॥

ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात् संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते ॥ ९ ॥

क्रोधाद् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ॥ १० ॥

राग-द्वेष-वियुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश् चरन् ।
आत्मवश्यैर् विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ११ ॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ १२ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ १३ ॥

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर् नावमिवाम्भसि ॥ १४ ॥

तस्माद् यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस् तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ १५ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ १६ ॥

आपूर्यमाणम् अचलप्रतिष्ठम्
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत् कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शांतिमाप्नोति न कामकामी ॥ १७ ॥

विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ १८ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ १९ ॥

विषयांचें करी ध्यान त्यास तो संग लागला ।
संगांतून फुटे काम क्रोध कामांत ठेविला ॥ ९ ॥

क्रोधांतूनि जडे मोह मोहानें स्मृति लोपली ।
स्मृतिलोपें बुद्धिनाश म्हणजे आत्मनाशची ॥ १० ॥

राग द्वेष परी जातां आलीं हातांत इंद्रियें ।
स्वामित्वें विषयीं वर्ते त्यास लाभे प्रसन्नता ॥ ११ ॥

प्रसन्नतेपुढें सर्व दुःखें जाती झडूनियां ।
प्रसन्नतेनें बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे ॥ १२ ॥

अयुक्तास नसे बुद्धि त्यामुळें भावना नसे ।
म्हणूनि न मिळे शांति शांतीविण कसें सुख ॥ १३ ॥

इंद्रियें वर्ततां स्वैर त्यामागें मन जाय जें ।
त्यानें प्रज्ञा जशी नौका वाऱ्यानें खेंचली जळीं ॥ १४ ॥

म्हणूनि इंद्रियें ज्यानें विषयांतूनि सर्वथा ।
ओढूनि घेतली आंत त्याची प्रज्ञा स्थिरावली ॥ १५ ॥

सर्व भूतांस जी रात्र जागतो संयमी तिथें ।
सर्व भूतें जिथें जागीं ज्ञानी योग्यास रात्र ती ॥ १६ ॥

न भंग पावे भरतां हि नित्य
समुद्र घेतो जिरवूनि पाणी ।
जाती तसे ज्यांत जिरूनि भोग
तो पावला शांति न भोग-लुब्ध ॥ १७ ॥

सोडूनि कामना सर्व फिरे होऊनि निःस्पृह ।
अहंता ममता गेली झाला तो शांतिरूपची ॥ १८ ॥

अर्जुना स्थिति ही ब्राह्मी पावतां न चळे पुन्हां ।
टिकूनि अंतकालीं हि ब्रह्मनिर्वाण मेळवी ॥ १९ ॥

# ईशावास्य उपनिषत्

तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहे, पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें, पूर्णांतून पूर्ण काढून घेतलें तरी, पूर्णच शेष राहतें. ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

१. हरि ॐ । जगांत जें कांहीं जीवन आहे तें हें सर्व ईश्वरानें वसविलेलें आहे. म्हणून, त्याच्या नांवानें त्यागून, तूं यथाप्राप्त भोगीत जा. कोणाच्याहि धनाविषयीं वासना राखूं नकोस.

२. इहलोकीं कर्मे करीत करीतच, शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरावी. तुला देहवंताला हाच मार्ग आहे. याहूनि वेगळा मार्ग नाहीं. मनुष्याला कर्म चिकटत नाहीं, फलवासना चिकटते.

३. आत्मज्ञानाचें शत्रुत्व करणारे, जे कोणी आत्मघातकी जन आहेत, ते देह पडल्यानंतर, घोर अंधारानें घेरलेल्या, आसुरी म्हणविलेल्या, योनींकडे वळत असतात.

४. तें आत्मतत्त्व एकच एक, मुळींच हालचाल न करणारें पण मनापेक्षां हि वेगवान् आहे. देव त्याला गांठूं शकत नाहींत, त्यानें मात्र देवांना केव्हांच गांठलेलें आहे. धांवणाऱ्या इतरांना तें उभें राहून मागें टाकतें. प्रकृति-मातेच्या अंकावर, खेळणारा प्राण, त्याच्याच सत्तेवर चळवळ करीत असतो.

५. तें हालचाल करतें आणि तें हालचाल करीत नाहीं; तें दूर आहे आणि तें जवळ आहे. तें या सर्वांच्या आंत आणि तें या सर्वांच्या बाहेर आहे.

६. जो निरंतर आत्म्यांतच सगळीं भूतें, आणि सगळ्या भूतांत आत्मा पाहतो, तो मग कोणाला हि आणि कशाला हि, कंटाळत नाहीं.

७. ज्याच्या दृष्टीनें आत्माच सर्व भूतें झाला त्या निरंतर एकत्व पाहणाऱ्या, विज्ञानी पुरुषाला, मोह कुठला आणि शोक कुठला ?

८. तो त्या तेजस्वी देहरहित, अतएव व्रणादि देहदोषांपासून, आणि स्नाय्वादि देहगुणांपासून, सर्वथा अलिप्त, शुद्ध आणि पापवेधमुक्त अशा

आत्मतत्त्वाला चारी बाजूंनीं वेढून बसला. तो कवि म्हणजे क्रांतदर्शी, वशी व्यापक आणि स्वतंत्र झाला. त्यानें शाश्वत काल पर्यंत टिकणारे सर्व अर्थ यथावत् साधले.

९. जे नेणिवेंत गढून गेले, ते गाढ अंधारांत शिरले; जे जाणिवेंत रमले, ते जणूं त्याहून घोर अंधारांत शिरले.

१०. आत्म तत्त्व जाणिवेहून, वेगळेंच म्हटलें आहे, आणि नेणिवेहून, वेगळें म्हटलें आहे. ज्यांनीं आम्हांला त्याचें दर्शन करविलें त्या धीर पुरुषाकडून आम्ही असें ऐकिलें आहे.

११. जाणीव आणि नेणीव या दोहोंसह, जे त्या आत्मतत्त्वाला जाणतात, ते त्या आत्मतत्त्वाच्या आधारें, नेणिवेनें मृत्यु तरून, जाणिवेनें अमृत गांठतात.

१२. जे निरोधांत गढून गेले, ते गाढ अंधारांत शिरले, जे विकासांत रमले, ते जणूं त्याहून घोर अंधारांत शिरले.

१३. आत्मतत्त्व जाणिवेहून वेगळेंच म्हटलें आहे, आणि नेणिवेहून वेगळें म्हटलें आहे. ज्यांनीं आम्हांला त्याचें दर्शन करविलें त्या धीर पुरुषाकडून, आम्हीं असें ऐकिलें आहे.

१४. विकास आणि निरोध या दोहोंसह, जे त्या आत्मतत्त्वाला जाणतात, ते त्या आत्मतत्त्वाच्या आधारें, निरोधानें मृत्यु तरून, विकासानें अमृत गांठतात.

१५. सुवर्णमय पात्रानें सत्याचें मुख झांकलेलें आहे, हे विश्वपोषक प्रभो, सत्यधर्माचा मी उपासक, माझ्या दर्शनासाठीं तें तूं उघडें कर.

१६. तूं या विश्वाचें पोषण करणारा, आणि तूंच एक निरीक्षण करणारा आहेस. तूं नियमन करणारा, आणि तूं उत्तम प्रवर्तन करणारा आहेस. तूं सर्वांचें प्रजावत् पालन करणारा आहेस. तुझे हे पोषणादि रश्मि, उलगडून,

आणि एकवटून, दाखव. तुझें तें तेजस्वी आणि परम कल्याणमय रूप, तें मी आतां पाहत आहें. तो जो परात्पर पुरुष तो मी आहें.

१७. हा प्राण त्या चैतन्यमय अमृत तत्त्वांत लीन होवो आणि मग शरीराची राख होवो. ईश्वराचें नांव घेऊन, हे दृढसंकल्पमय जीवा, आठव, त्याचें केलेलें आठव. हे माझ्या जीवा, आठव. आपले संकल्प सोडून त्याचें केलेलें आठव.

१८. हे मार्गदर्शक दैदीप्यमान प्रभो, विश्वांत विणलेलीं सर्व तत्त्वें तुला अवगत आहेत, आम्हांला सरळ मार्गानें त्या परम आनंदाकडे घेऊन जा. वाकडें जाणारें पाप तूं आमुच्यापासून पिटाळून लाव. तुला आम्ही पुन्हां पुन्हां नम्र वाणीनें विनवीत आहोंत.

तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहे, पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें. पूर्णातून पूर्ण काढून घेतलें तरी, पूर्णच शेष राहतें. ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..................... विः .....................
क्रमांक ..................... नोंः दिः .....................

# सुटे मंत्र

१

हरिः ॐ । ईशावास्यमिदं सर्वं
यत् किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथाः
मा गृधः कस्यस्वित् धनम् ।

## अर्थ

जगांत जें कांहीं जीवन आहे
तें हें सर्व ईश्वरानें वसविलेलें आहे ।
म्हणून, त्याच्या नांवानें त्यागून
तूं यथाप्राप्त भोगीत जा ।
कोणाच्या हि धनाविषयीं
वासना राखूं नकोस ॥

२

विपदो नैव विपदः
संपदो नैव संपदः ।
विपद् विस्मरणं विष्णोः
संपन्नारायणस्मृतिः ।

## अर्थ

संकटें हीं खरीं संकटें नव्हेत. धनदौलत ही खरी संपत्ति नव्हे. विष्णूचा विसर हें संकट, नारायणाचें स्मरण हीच खरी संपत्ति.

## ३. कुराणातील प्रार्थना

अऊज़ु बिल्लाहि मिनश् शैत्वानिर् रजीम् ।
बिस्मिल्लाहिर् रहमानिर् रहीम ।
अल हम्दु लिल्लाहि रब्बिल् आलमीन ।
अर् रह्मानिर् रहीम, मालिकि यौमिद् दीन ।
ईयाक नअबुदु व ईयाक नस्तईम ।
इह् दिनस् सिरातल् मुस्तकीम ।
सिरातल् लज़ीम अन् अम्त अलैहिम ।
गैरिल् मगदूबे अलैहिम व लज्जुआल्लीन ।
आमीन.

बिस्मिल्लाहिर् रह्मानिर् रहीम ।
कुल हुवल्लाहु अहद् । अल्लाहुस्समद् ।
लम् यलिद् वलम् यूलद्
व लम् यकुल्लहू कुफवन् अहद्

### अर्थ

आरंभीं अल्लाचें नाम कृपाळू जो कनवाळू ।
स्तुति त्या देवाची, प्रभु जो विश्वाचा,
कृपाळू कनवाळू, स्वामी शेवटच्या दिवसाचा,
तुझी करूं भक्ति, तुझीच रे याचना ।
सरळ मार्ग दाखिव तूं आम्हां,
ज्यांवरि तूं करितोसि कृपा त्यांचा,
न ज्यांवरि तुझा प्रकोप उतरे,
न वा भ्रमित जे त्यांचा ।
आरंभीं अल्लाचें नाम कृपाळू जो कनवाळू
म्हणे रे देव तो एक
देव तो निरपेक्षची,
नसे पिता नसे पुत्र
नसे कोणी हि तत्सम ।

४

## जरथोस्ती गाथा

मनदा अत मोइ वहिश्ता
सवा ओस्चा श्योथनाचा अवोचा ।
ता-तू वहू मनंघहा
अशाचा इषुदेम स्तुतो
क्षमा का श्रथा अहूरा फेर्षेम्
वस्ता हइ श्येम् दाओ अहुम् ॥

### अर्थ

हे परमेश्वरा, सर्वोत्तम धर्मांचे शब्द व कार्यं यांविषयीं मला सांग, कीं जेणेंकरून मी नेकीच्या मार्गावर राहून तुझा महिमा गात जाईन. तूं आपल्या इच्छेनुसार मला चालव. माझ्या जीवनांत ताजेपणा आण आणि मला स्वर्गीय सुख दे.

५

## बौद्धधर्मीय प्रार्थना

नं म्यो हो रें गे क्यो ।

### अर्थ

सर्व बुद्धांना नमस्कार.

६

## वैदिक प्रार्थना

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

### अर्थ

आम्हा दोघांचें एकत्र रक्षण करो; आम्हां दोघांचा एकत्र उपयोग करो; (गुरु-शिष्य) एकत्र पुरुषार्थ करूं या; आपलें अध्ययन तेजस्वी होवो. आपण एकमेकांचा द्वेष करूं नये. ॐ शांति, शांति, शांति,

७

ॐ असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर् गमय ।
मृत्योर् माऽमृतं गमय ।

## अर्थ

हे प्रभो नेईं मज
खोट्यांतूनि खऱ्याकडे,
तमांतूनि ज्योतीकडे
मृत्यूंतूनि अमृताकडे

८

संगच्छध्वम् संवदध्वम् सं वो मनांसि जानताम् ।
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ।
समानो मंत्रः समितिः समानी, समानं मनः
सहचित्तमेषाम् । समानं मंत्रम् अभिमंत्रये वः,
समानेन वो हविषा जुहोमि ।
समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति । यथा
वः सुसहासति ।

## अर्थ

मिळून बोला, मिळून चाला, तुमचीं मनें एकत्र जुळोत; ज्याप्रमाणें देव पूर्वी एकमतानें आपापला हविर्भाग ग्रहण करीत तसेच तुम्हीहि, एकमतानें धनधान्यादि ग्रहण करा.

तुमचा मंत्र एक असो, बसणें उठणें एकत्र असो, तुमचें मन समान असो, चित्त जुळतें असो. तुम्हांला एकाच मंत्राची दीक्षा देतों, तुमचें एकाच आहुतीनें हवन करतों.

तुमचे संकल्प एक असोत; तुमचीं हृदयें एक होवोत; तुमचीं अंतःकरणें एक होवोत, कीं जेणेंकरून तुमच्या संघशक्तीला बळकटी येईल.

९

## सर्वधर्मस्मरण

ॐ तत्सत् श्री नारायण तूं पुरुषोत्तम गुरु तू
सिद्ध बुद्ध तूं स्कंद विनायक सविता पावक तूं ।
ब्रह्म मज्द तूं यह्व शक्ति तूं ईशुपिता प्रभु तूं ।
रुद्र विष्णु तूं राम कृष्ण तू रहीम ताओ तूं ।
वासुदेव गो-विश्व-रूप तू चिदानंद हरि तूं ।
अद्वितीय तूं अकाल निर्भय आत्मलिंग शिव तूं ॥

१०

## अकरा व्रतें

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन ॥ १ ॥
सर्वधर्मीं समानत्व स्वदेशी स्पर्श-भावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रत निश्चयें ॥ २ ॥

११

## शीख प्रार्थना

एकोंकार सत् नाम । कर्ता पुरुख । निर्भउ
निर्वैर । अकाल मूरत अजूनि । सै भं गुरुप्रसाद् ।

जपु

आदि सचु । जुगादि सचु । हैं भी सचु । ( नानक )
दोसी भी सचु ।
आदि सचु । जुगादि सचु । हैं भि सचु । ( नानक )
दोसी भी सचु ।

## अर्थ

ईश्वर एकच आहे, सृष्टि त्याचा आकार ( पसारा ) आहे. त्याचें नांव सत्य आहे. तो सृष्टिकर्ता आहे. त्याला कोणाचें भय नाहीं. त्याचें कोणाशीं वैर नाहीं. तो कालातीत आहे. तो कल्पित नाहीं तर मूर्तिमान् आहे. तो अजन्मा आहे. गुरूच्या कृपेनें तो प्राप्त होतो.

त्या ईश्वराचा जप करा—

तो युगांच्या आदिकालापासून होता, आज हि आहे व भविष्यामध्यें हि राहील.

१२

## गांधीजींनीं रचलेली प्रार्थना

हे नम्रतेच्या सम्राटा ! दीन भंग्यांच्या जीर्णशीर्ण झोपड्यांमध्यें निवास करणाऱ्या, गंगा, यमुना व ब्रह्मपुत्रेच्या पाण्यानें सिंचिलेल्या या सुंदर देशामध्यें सर्वत्र तुझा शोध करण्याच्या कामीं तूं आम्हांस मदत कर.

आम्हांला ग्रहणशीलता व खुलें हृदय दे.

तुझी अनन्य नम्रता आम्हांला दे.

हे भगवन्, जेव्हां मनुष्य शून्यवत् बनून तुला शरण येतो तेव्हां तूं त्याच्या मदतीला धांवून येतोस.

ज्या जनतेची सेवा आम्ही तिचे सेवक व मित्र या नात्यानें करूं इच्छितों, त्या जनतेपासून आम्ही कधीं वेगळे पडूं नये, एवढें वरदान आम्हांला दे.

त्याग, भक्ति व नम्रता आमच्यामध्यें मूर्तिमंत असोत. तेणेंकरून आम्ही या देशाचें योग्य ज्ञान प्राप्त करून त्याच्यावर प्रेम करूं.

१२

भोजनारंभीं पुढील श्लोक म्हणण्याची वहिवाट आहे:—

१ वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ।
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें ।
जीवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म ।
उदर-भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥

२ अन्न हें सर्व विश्वाचें । विश्वासाठींच सेविजे ।
सेवुनी सुख हो सर्वां । सेवनीं हेचि भावना ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८८१

# सुबोध प्रातःप्रार्थना

१ हरिः ॐ । ईशावास्यामिदं सर्वं
यत् किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथाः
मा गृधः कस्यस्विद् धनम् ।

२ ॐ असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर् गमय ।
मृत्योर् माऽमृतं गमय ।

३ प्रभातसमयीं तुला स्मरतसें जगन्मोहना ।
जरी असिस चिन्मया खलु अगम्य वाणीमना ।
सदा स्फुरसि अंतरीं सकल विश्व तूं व्यापिलें ।
कळे न परि मी भजें गुरुजनीं जसें बोधिलें ॥

४ ब्रह्मा विष्णु असो, सदाशिव असो, कीं बुद्ध योगेश्वर ।
आकाशस्थ पिता हि सिद्ध अथवा अल्ला हि नाकेश्वर ।
राग-द्वेष नसे, प्रियाप्रिय नसे, सत्त्वीं उदेली दया ।
ऐसा जो विभु विश्वचालक असे त्यातें नमीं सर्वदा ॥

५ न याचीं तुजला राज्यें नच स्वर्ग न मुक्ति हि ।
दुःखें जीं दुःखतप्तांचीं नाशती प्रार्थना तुला ॥

६ मना भारतीं जन्म ये पुण्यलाभें ।
महासुकृतें मानवी देह लाभे ।
असा योग हा जाहला प्राप्त तूतें ।
तनू वेंच ही सेवुनी भारतातें ॥

७ खळाचीं व्यकटीं सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो ।
भूतां परस्परीं जडो । मैत्र जीवींचे

८ हे प्रभो आनंददाता ज्ञान हमको दीजिये ।
शीघ्र सारे दुर्गुणोंको दूर हमसे कीजिये ।
लीजिये हमको शरणमें हम सदाचारी बने ।
ब्रह्मचारी धर्मरक्षक वीरव्रतधारी बने ॥

९ ॐ असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर गमय ।
मृत्योर् माऽमृतं गमय ।

१० आरंभीं अल्लाचें नाम कृपाळू जो कनवाळू ।
स्तुति त्या देवाची, प्रभु जो विश्वाचा,
कृपाळू कनवाळू, स्वामी शेवटच्या दिवसाचा,
तुझी करूं भक्ति, तुझीच रे याचना ।

सरळ मार्ग दाखिव तूं आम्हां,
ज्यावरि तूं करितोसि कृपा त्यांचा,
न ज्यावरि तुझा प्रकोप उतरे,
न वा भ्रमित जे त्यांचा ।

## ५ सुबोध सायंप्रार्थना

१ सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ।
सदंघ्रिकमलीं दडो मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥

२ न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्नबाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ।
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हां न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥

३ सुनीति पथ सेवणें मलिन कर्म मानेच ना ।
घडो मरण नावडे खलजनाप्रति प्रार्थना ।
विपत्तिसमयीं हि जो प्रकटवीच ना दीनता ।
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ॥

४ अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन ॥ १ ॥
सर्वधर्मीं समानत्व स्वदेशी स्पर्श-भावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रत निश्चयें ॥ २ ॥

५ ॐ तत् सत् श्री नारायण तूं पुरुषोत्तम गुरु तूं
सिद्ध बुद्ध तूं स्कंद विनायक सविता पावक तूं ।
रुद्र विष्णु तूं राम कृष्ण तूं रहीम ताओ तूं ।
ब्रह्म मज्द तूं यह्व शक्ति तूं ईशूपिता प्रभु तूं ।
वासुदेव गो-विश्व-रूप तूं चिदानंद हरि तूं ।
अद्वितीय तूं अकाल निर्भय आत्मलिंग शिव तूं ॥

# भजनें ( धूना )

१ रघुपति राघव राजाराम । पतित पावन सीताराम ॥
ईश्वर अल्ला तेरे नाम । सबको सन्मति दे भगवान् ॥
जानकिजीवन रामनाम । सुंदर माधव मेघश्याम ॥

२ नारायण नारायण जय गोविंद हरे ।
नारायण नारायण जय गोपाल हरे ।

३ राजाराम राम राम । सीताराम राम राम ।

४ श्रीराम जयराम जय जयराम ।

५ हरे राम, हरे राम, हरे राम हरे । भज मन निशी-दिनीं प्यारे ।

६ हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।

७ भजावा राम मेघश्याम । मनीं आठवा हो सीताराम ।
मनीं आठवा हो राजाराम ।

८ पावना रामा; पतित–पावना रामा ।

९ रामधून लागी, गोपालधून लागी ।

१० गोपाळ राधा–कृष्ण गोविंद गोविंद । गोपाल ।

११ राधाकृष्ण जय कुंजविहारी । मुरलीधर गोवर्धनधारी ।

१२ बोल हरी, बोल हरी, हरी हरी बोल ।
केशव माधव गोविंद बोल ।

१३ ध्या मुकुंद मुरारि गोविंद ।
आनंदकंद हा ध्या छंद ।
ध्या मुकुंद, ध्या मुरारी, ध्या गोविंद ।

१४ निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाइ एकनाथ नामदेव तुकाराम ।

१५ ज्ञानेश्वर माउली, ज्ञानदेव माउली तुकाराम ।

१६ सियास्वामी की जय, प्यारे राघव की जय,
बोलो हनुमान् कृपालुकी जय जय जय ।

१७ कैसा प्यारा सुंदर नाम । सीताराम जय सीताराम ।

१८ भज मन प्यारे सीताराम ।

१९ शिवहर शंकर गौरीशं । वंदे गंगाधरमीशम् ।

२० सांभ सदाशिव सांभ । जयजय सांभ सदाशिव सांभ ।

२१ मार्गीं हळू हळू चाला । मुखानें विठ्ठल बोला ।

२२ घडि एक जाते कर्तव्याची, आनंदाची ।
सोपी वाट सद्धर्मांची । जनसेवेची ।
सोपी वाट सद्धर्मांची । प्रभुसेवेची ।

२३ नहि है मेरा, नहि यह तेरा, ईश्वर का यह राज है ।
ईश्वर का जल, ईश्वर का थल, ईश्वर का हि अनाज है ।
बिनुश्रम खावे, चोर कहावे, गीताकी आवाज हैं ।

२४ श्री शिवजी का डमरू बोले ।
रघुपति राघव राजाराम ।
नारदजीकी वीणा बोले,
पतितपावन सीताराम ।
हनुमानजीके मुखसे निकले,
श्रीराम जयराम जयराम ।

२५ राधेश्याम बोलो, सीताराम बोलो ।

राधेश्याम बोलो, सीताराम बोलो ।

२६ क्या लेकर तू आया जगमें,

क्या लेकर तू जायेगा । क्या लेकर तू जायेगा ।

मुठ्ठि बांधकर आया जगमें

हाथ पसारे जायेगा । हाथ पसारे जायेगा ।

साचो तेरो नाम है, साचो तेरो नाम है ।

झूठी जग की लालसा, साचो तेरो नाम है ।

२७ राज्य मागूं नही, स्वर्ग मागूं नही, मोक्षकी नींद में क्या मजा है ।
दीन के दुःख-भव-भय मिटाता रहूं । दीन-बंधो यही वर मुझे दे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# पद्यें मराठी

१

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
न लगे मुक्ति धनसंपदा । संत-संग दे गा सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

२

जेथें जातों तेथें । तूं माझा सांगाती । चालवीसी हातीं । धरोनियां ॥ १ ॥
चालूं जातां वाटे । तुझाची आधार । चालवीसी भार । स्वयें माझा ॥ २ ॥
बोलूं जातां बरळ । करिशी तें नीट । नेलि लाज धीट । केलों देवा ॥ ३ ॥
अवघे जन मज । झाले लोकपाळ । सोयरे सकळ । प्राणसखे ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां । खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख । अंतर्बाह्य ॥ ५ ॥

३

घेइं घेइं माझे वाचे । गोड नाम विठ्ठलाचें ॥ १ ॥
तुम्ही आइका रे कान । माझ्या विठ्ठलाचे गुण ॥ २ ॥
डोळे तुम्ही घ्या रे सुख । पहा विठ्ठलाचें मुख ॥ ३ ॥
मना तेथें धांव घेईं । राहि राघवाचे पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे अगा जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

४

पापाची वासना । नको दावूं डोळां । त्याहूनी आंधळा । बराच मी ॥ १ ॥
निंदेचें श्रवण । नको माझे कानीं । बधिर करोनी । ठेवीं देवा ॥ २ ॥
अपवित्र वाणी । नयो माझ्या मुखा । करूनियां मुका । ठेवीं देवा ॥ ३ ॥
नको मज कधीं । परस्त्री-संगति । जनांतूनि माती । उठतां भली ॥ ४ ॥
तुका म्हणे मज । अवघ्याचा कंटाळा । तूं एक गोपाळा । आवडसी ॥ ५ ॥

५

न कळतां काय । करावा उपाय । जेणें राहे भाव । तुझे पायीं ॥ १ ॥
येऊनियां वास । करिसी हृदयीं । ऐसें घडे कई । कासयानें ॥ २ ॥
साच भावें तुझें । चिंतन मानसीं । राहे हें करिसी । कैंगा देवा ॥ ३ ॥
लटिकें हें माझें । करोनियां दूरी । साच तूं अंतरीं । येउनि राहें ॥ ४ ॥
तुका म्हणे मज । राखावें पतिता । आपुलिया सत्ता । पंढरिराया ॥ ५ ॥

६

ऐसें भाग्य कई । लाहता होईन । अवघे देखें जन । ब्रह्मरूप ॥ १ ॥
मग तया सुखा । अंत नाहिं पार । आनंदें सागरा । हेलावती ॥ २ ॥
शांति क्षमा दया । मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं । कामादि कां ॥ ३ ॥
विवेकासहित । वैराग्याचें बळ । धगधगीत ज्वाळ । अग्नी जैसा ॥ ४ ॥
भक्ति नवविधा । भाव शुद्ध वरी । अलंकारावरी । मुगुट-मणि ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी । पुरवी वासना । कोण नारायणा । तुजवीण ॥ ६ ॥

७

नरनारी बाळें । अवघा नारायण । एसें माझें मन । करीं देवा ॥ १ ॥
न यो काम क्रोध । द्वेष निंदा द्वंद्व । अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥
असावें म्यां सदा । विषयीं विरक्त । काया वाचा चित्त । तुझे पायीं ॥ ३ ॥
करोनियां साह्य । पुरवीं मनोरथ । व्हावें कृपावंत । तुका म्हणे ॥ ४ ॥

८

आणिक दुसरें । मज नाहिं आतां । नेमिलें या चित्ता । पासूनियां ॥ १ ॥
पांडुरंग ध्यानीं । पांडुरंग मनीं । जागृती स्वप्नीं । पांडुरंग ॥ २ ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा । नाहीं दुजा ॥ ३ ॥
तुका म्हणे नेत्रीं । केली ओळखण । तटस्थ तें ध्यान । विटेवरी ॥ ४ ॥

९

शांतिपरतें नाहिं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥
म्हणोनियां शांति धरा । उतराल पैलतीरा ॥ २ ॥
खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधिव्याधि ॥ ३ ॥
म्हणोनियां शांति धरा । उतराल पैलतीरा ॥ ४ ॥
तुका म्हणे त्रिविध ताप । मग जाती आपेंआप ॥ ५ ॥

१०

माझिये जातीचें । मज भेटो कोणी । आवडीची धणी । फेडावया ॥ १ ॥
आवडे ज्या हरि । अंतरापासोनी । ऐसियांचे मनीं । आर्त माझें ॥ २ ॥
तयालागिं जीव । होतो कासावीस । पहातील वास । नयन हे ॥ ३ ॥
सुफल हा जन्म । होइल तेथून । देतां आलिंगन । वैष्णवासी ॥ ४ ॥
तुका म्हणे तोची । सुदिन सोहळा । गाउं या गोपाळा । धणीभरी ॥ ५ ॥

११

विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगल ॥ १ ॥
आईकाजी तुम्ही । भक्त भागवत । कराल तें हित । सत्य करा ॥ २ ॥
कोणाहि जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर-पूजनाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे एका । देहाचे अवयव । सुखदुःख जीव । भोग पावे ॥ ४ ॥

१२

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोची साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगों किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ ६ ॥

१३

काय वानुं आतां । न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं । ठेवियेलें ॥ १ ॥
थोरीव सांडिली । आपुली परिसें । नेणें शिवों कैसें । लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति । देह कष्टविती । उपकारें ॥ ३ ॥
भूतांची दया हें । भांडवल संतां । आपुली ममता । नाहीं देहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सुख । पराचिया सुखें । अमृत तें मुखें । स्रवतसे ॥ ५ ॥

१४

नाहीं संतपण । मिळत तें हाटीं । हिंडतां कपाटीं । रानीं वनीं ॥ १ ॥
नये मोल देतां । धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं । पाताळीं तें ॥ २ ॥
तुका म्हणे मिळे । जीवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी । बोलों नये ॥ ३ ॥

१५

न मिळो खावया । न वाढो संतान । परि हा नारायण । कृपा करो ॥ १ ॥
ऐसी माझी वाचा । मन उपदेशी । आणीक लोकांसी । हेंची सांगे ॥ २ ॥
विटंबो शरीर । होत कां विपत्ति । परी राहो चित्तीं । नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ । तेंची हित ॥ ४ ॥

१६

आम्हि वैकुंठवासी । आलों याची कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साचभावें वर्ताया ॥ १ ॥

झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥ २ ॥

अर्थ लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषय लोभी मनें । साधनें बुडविलीं ॥ ३ ॥

पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥ ४ ॥

१७

देव माझा मी देवाचा । सत्य सत्य हीच वाचा ॥ १ ॥
देह देवाचें देऊळ । आंत बाहेर निर्मळ ॥ २ ॥
देव पहावया गेलों । तेथें देवाचि होउनि ठेलों ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य झालों । आजि विठ्ठला भेटलों ॥ ४ ॥

१८

प्राण जाई देहांतून ।
पुत्र पुसे कोठें धन ॥ १ ॥
कोणा उधार दिलेंसी ।
हें तों सांग आम्हांपाशीं ॥ २ ॥
त्याची खुंटलीसे वाणी ।
धन पुसती छळोनी ॥ ३ ॥
तुका म्हणे धन ।
भाग्य अशाश्वत जाण ॥ ४ ॥

१९

काय कुणाचें खातों रे

अम्हि काय कुणाचें खातों रे । तो राम अम्हांला देतो रे ॥ ध्रु० ॥
बांधिले घुमट किल्ल्याचे तट । त्याला फुटती पिंपळवट ।
तेथें कोण बांधितो मोट । कोण पाजितो पाणी रे ॥ १ ॥
खडक फोडितां सजीव रोडकी । सर्वांनीं पाहिली बेडकी ।
सिंधू नसतां तियेचे मुखीं । कोण घालितो पाणी रे ॥ २ ॥
पहा रे पहा मातेचे स्तनीं । लक्षितां रक्त मांस मलखाणी ।
तेथें विमल दुग्ध घालोनी । कोण पोशितो बाळा रे ॥ ३ ॥
नसतां पाण्याचे बुडबुडे । सदासर्वदा गगन कोरडें ।
नाथ म्हणे जीवन चहुंकडे । पाडुनी सडे पीक उगवीतो ॥ ४ ॥

२०

धांव रे राम राया । किती अंत पाहासी ।
प्राणांत मांडियेला । न ये करुणा कैसी ॥ ध्रु० ॥

पाहीन धणीभरी । चरण झाडीन केशीं ।
नयन शिणले बा । आतां केधवां येशी ॥ १ ॥

मीपण-अहंकारें । अंगीं भरलासे ताठा ।
विषयकर्दमांत । लाज न वाटे लोळतां ।
चिळस उपजेना । ऐसें झालें बा आतां ॥ २ ॥

मारुतीस्कंधभागीं । शीघ्र बैसोनी यावें ।
राघवें वैद्यराजें । कृपाऔषध द्यावें ।
दयेचे पद्महस्त । माझे शिरीं ठेवावे ॥ ३ ॥

या भवीं रामदास । थोर पावतो व्यथा ।
कौतुक पाहतोसी । काय जानकीकांता ।
दीननाथा दीनबंधो । भक्तवत्सला आतां ॥ ४ ॥

२१

कल्याण करीं देवराया, जनहित विवरीं ।
तळमळ तळमळ होताचि आहे, हे जन हातीं धरीं ॥ १ ॥
अपराधी जन चुकतचि गेले, तूंचि तुझा सावरीं ॥ २ ॥
कठिण त्यावरी कठिण आलें, आतां न दिसे उरी ॥ ३ ॥
कोठें जावें काय करावें, आरंभिलि बोहरी ॥ ४ ॥
दास म्हणे आम्हीं केलें पावलों, दयेसि नाहिं सरी ॥ ५ ॥

२२

देव जवळि अंतरीं ।
भेटि नाहीं जन्मवेरी ॥ १ ॥
मूर्ति त्रैलोक्यीं संचली ।
दृष्टि विश्वाची चुकली ॥ २ ॥
भाग्यें आले संतजन ।
झालें देवाचें दर्शन ॥ ३ ॥
रामदासीं योग झाला ।
देहिं देव प्रगटला ॥ ४ ॥

२३

तूं माझी माउली । मी वो तुझा तान्हा ।
पाजीं प्रेम पान्हा पांडुरंगे ॥ १ ॥
तूं माझी गाउली । मी तुझें वासरूं ।
नको पान्हा चोरूं । पांडुरंगे ॥ २ ॥
तूं माझी हरिणी । मी तुझें पाडस ।
तोडी भवपाश । पांडुरंगे ॥ ३ ॥
तूं माझी पक्षिणी । मी तुझें अंडज ।
चारा घालीं मज । पांडुरंगे ॥ ४ ॥
नामा म्हणे होसी । भक्तीचा वल्लभ ।
मागें पुढें उभा । सांभाळिसी ॥ ५ ॥

२४

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरिनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगल नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥
नामा म्हणे केशीराजा । केला नेम चालवीं माझा ॥ ४ ॥

२५

बोलूं बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ॥ १ ॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल-रखुमाई ॥ २ ॥
नाचुं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ ३ ॥
परेहुनी परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥ ४ ॥
सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ॥ ५ ॥

२६

काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल ।
नांदतो केवळ । पांडुरंग ॥ १ ॥
भाव भक्ति भीमा । उदक तें वाहे ।
बरवा शोभताहे । पांडुरंग ॥ २ ।
दया क्षमा शांति । हेंचि वाळुवंट ।
मिळालासे थाट । वैष्णवांचा ॥ ३ ॥
देहीं देखियेली । पंढरी जनीं वनीं ।
एका जनार्दनीं । वारी करी ॥ ४ ॥

२७

तें मन निष्ठुर कां केलें
जें पूर्ण दयेनें भरलें ॥ ध्रु० ॥
गजेंद्राचे हांकेसरिसें । धावुनियां आलें ॥ १ ॥
प्रल्हादाच्या भावार्थासीं । स्तंभीं गुरगुरलें ॥ २ ॥
पांचाळीच्या करुणावचनें । कळवळुनी आलें ॥ ३ ॥
एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें । निशिदिनिं पदिं रमलें ॥ ४ ॥

२८

भक्तीं आकळिला । दयाघन, भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥
पार्थ-रथीं सारथ्य करी जो । निज पद दे बळिला ॥ १ ॥
प्रल्हादास्तव प्रगटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ २ ॥
रुक्मिणीनें एक्या तुलसीदलानें । गिरिधर प्रभु तुळिला ॥ ३ ॥

२९

भाव धरा रे । अपुलासा देव करा रे ॥ ध्रु० ॥
कोणी कांहिं म्हणो यासाठीं । बळकट प्रेम असावें गांठीं ।
निंदास्तुतिवर लावुनि काठी । मी तूं हरा रे ॥ १ ॥
सकाम साधन सर्वहि सांडा । निष्कामें मूळ भजनीं भांडा ।
नाना कुतर्कवृत्तिसि दवडा । आलि जरा रे ॥ २ ॥
दुर्लभ नर-देहाची प्राप्ती । पुन्हां न मिळे हा कल्पांतीं ।
ऐसा विवेक आणुनि चित्तीं । गुरुसि वरा रे ॥ ३ ॥
केसरिनाथ गुरूचे पायीं । सृष्टी आजि बुडाली पाहीं ।
शिवदिनिं निश्चय दुसरा नाहीं । भक्त-सखा रे ॥ ४ ॥

३०

अजि म्यां ब्रह्म पाहिलें ।
अगणित सुरगण वर्णिति ज्याला ।
कटिं कर नटसम चरण विटेवरि, उभें राहिलें ॥ ध्रु० ॥
चोखामेळ्याचीं ढोरें ओढितां । शिणला नाहीं तो तत्त्वतां ।
जनीसंगें दळितां कांडितां । गाणें गाइलें । हरीनें ॥ १ ॥
एकनाथाच्या भक्तीसाठीं । धांवुनि आला तो जगजेठी ।
खांदीं कावड आवड मोठी । पाणी वाहिलें । हरीनें ॥ २ ॥
सांवता माळ्याची भाजी विकिसी । कबीराचे शेले विणिसी ।
गोरोबाचें बाळ रक्षिसी । चिखलीं तुडविलें ॥ ३ ॥
दामाजीची रसीद भरली । कान्होपात्रा ती उद्धरली ।
अमृतराय म्हणे कैसि माउली । संकट वारिलें ॥ ४ ॥

३१

अशाश्वत संग्रह कोण करी ॥ ध्रु० ॥
कोण करी घर सोपे माड्या । झोपडि हेचि बरी ॥ १ ॥
चिरगुट चिंध्या जोडुनि कंथा । गोधडि हेचि बरी ॥ २ ॥
नित्य नवें जें देइल माधव । भक्षूं तेंचि घरीं ॥ ३ ॥
अमृत म्हणे मज भिक्षाडोहळे । येति अशा लहरी ॥ ४ ॥

३२

भक्तांचिया काजासाठीं । साधूंचिया प्रेमासाठीं ।
सोडिलीं मीं लाज रे ॥ ध्रु० ॥
दुर्योधनसदनिं न गेलों । विदुराच्या गृहा आलों ।
आवडिनें कण्या प्यालों । जोंधळ्याची पेज रे ॥ १ ॥
धूतों अर्जुनाचे घोडे । सदा राहें मागेंपुढें ।
धर्मगृहीं काढि उच्छिष्टें । बांधुनीया माज रे ॥ २ ॥
वेडीं गौळियांचीं पोरें । त्यांचें ताक प्यालों बा रे ।
आतां भिल्लिणीचीं बोरें । उच्छिष्टाची चोज रे ॥ ३ ॥
पूर्ण ब्रह्म म्हणती मातें । पूर्ण ब्रह्म मीच त्यांतें ।
ऐसियांची जाणीव ते । धरी अमृतराय रे ॥ ४ ॥

३३

संत-पदाची जोड, दे रे हरी संत-पदाची जोड ॥ ध्रु० ॥
संतसमागमें आत्म सुखाचा । सुंदर उगवे मोड ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविति जीवींचे कोड ॥ २ ॥
अमृत म्हणे रे हरिभक्तांचा । शेवट करिसी गोड ॥ ३ ॥

३४

स्मरतां नित्य हरी । मग ती माया काय करी ॥ ध्रु० ॥
श्रवणें मननें अद्वय वचनें । पळतो काळ दुरी ॥ १ ॥
करुणाकर वरदायक हरि जो । ठेवित हात शिरीं ॥ २ ॥
तोचि निरंतर उद्धव चरणीं । अमृत पान करी ॥ ३ ॥

३५

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे ॥ ध्रु० ॥
दोरीच्या सापा भिउनि भवा । भेटि नाहिं जीवा-शिवा ।
अंतरिंचा ज्ञानदिवा । मालवूं नको रे ॥ १ ॥
विवेकाचि ठरेल ओल । ऐसे बोलावे कीं बोल ।
आपुले मतें उगिच चिखल । कालवूं नको रे ॥ २ ॥
संत-संगतीनें उमज । आणुनी मनीं पुरतें समज ।
अनुभवावीण मान । हालवूं नको रे ॥ ३ ॥
सोहिरा म्हणे ज्ञानज्योति । तेथें कैंचि दिवसराति ।
तयाविणें नेत्रपातीं । हालवूं नको रे ॥ ४ ॥

३६

नियम पाळावे । जरि म्हणशिल योगी व्हावें ॥ ध्रु० ॥
रसनेचा जो अंकित झाला । सदैव निद्रेला जो विकला ।
तो नर योगाभ्यासा मुकला । असें समजावें ॥ १ ॥
रात्रीं निद्रा परिमित घ्यावी । भोजनांत हि मिति असावी ।
शब्दवल्गना बहु न करावी । साधक-जीवें ॥ २ ॥
यापरि सकलाहार-विहारीं । नियमित व्हावें मनिं अवधारीं ।
निजरूपोन्मुख होउनि अंतरीं । चित्त मग धावें ॥ ३ ॥
विषयांपासुनि वळतां वृत्ति । येइल सहजचि आत्म्यावरती ।
जैसा निश्चळ दीप निवातीं । समाधी पावे ॥ ४ ॥
बुद्धिग्राह्य अतींद्रिय सुख तें । वर्णाया श्रुति अक्षम त्यातें ।
मग तें कैसें कृष्ण-सुतातें । बोलतां यावें ॥ ५ ॥

३७

सांगड बांधा रे भक्तीची । रघुनाथ नामाची ॥ १ ॥
संसार सागर, सागर । भरला जातो पूर ॥ २ ॥
लाटा उसळती विषयाच्या । बहुत प्रपंचाच्या ॥ ३ ॥
संसृति भोंवरा भोंवरा । फिरत असे गरगरां ॥ ४ ॥
नरहरि बोधला बोधला । हरिनामीं रंगला ॥ ५ ॥

३८

निरिच्छता दे मज देवा,
करीन संतत तव सेवा ॥ १ ॥
लोभ जडो मनिं न धनाचा,
धाक उडावा निधनाचा ॥ २ ॥
जावा चित्तांतुनि कोप,
व्हावा दंभाचा लोप ॥ ३ ॥
सोडो हृदया न तितिक्षा,
आवडो हृदया तव दीक्षा ॥ ४ ॥
येवो विषयांचा वीट,
होवो भजनीं मन धीट ॥ ५ ॥
देहें झालों तव बंदा,
गोपी आनंदा सुखकंदा ॥ ६ ॥
नंदनंदना गोविंदा,
गोपीआनंदा सुखकंदा ॥ ७ ॥

३९

नरतनु व्यर्थ जाणार । काळ खाणार ।
अरे जीवा सांग तूं मला आपुलें स्वहित कधीं करणार ॥ ध्रु० ॥
चौर्यायशी लक्ष हे फेरे फिरतां श्रम झाले वा रे ।
आतां तरि सावध होई रे । गुरुराय करुनि घे साह्य
तयाविण मरण कसें चुकणार ? ॥ १ ॥
उत्तम ही मानवकाया । स्टेशन बघ आलें सखया ।
श्रद्धेचें धन देउनियां । हरिभक्ति तिकिट घे त्वरित
पहा हे सहा चोर अनिवार ॥ २ ॥

नानाविध देखुनि सोयी । रमशील जरी या ठायीं ।
वेड्या मग होइल घाई । दंडील शिपाई काळ
तुला ती वेळ कठिण येणार ॥ ३ ॥
गुरु कोण असा मज दावी । सत्याचि वाट जो दावी ।
श्री जालंधर सोसावी । धरि चरण जाइ त्या शरण
तयाविण मरण कसें चुकणार ॥ ४ ॥

४०

जय जयराम कृष्ण हरी ।
गोवर्धनधर गोपालनव्रत गोकुळ-संकट'हारी रे ॥ १ ॥
नवनीरदसम नवनीतप्रिय नवलविनोदविहारी रे ॥ २ ॥
दुर्वासोनुत दुःखविमोचक दुर्जन-संगम-हारी रे ॥ ३ ॥
जनतारूपि जनार्दन सारा प्रकट फिरे गिरिधारी रे ॥ ४ ॥
राम रहीम् अल्ला येशू हीं नांवें त्याचीं सारीं रे ॥ ५ ॥
सारे मानव पुत्र तयाचे, एक पिता अवधारीं रे ॥ ६ ॥
प्रेमधर्म जगता सांगाया वाजवि मुरली मुरारी रे ॥ ७ ॥

४१

पावन करिं मंदिर । प्रभुजी । करिं पावन० ॥ ध्रु० ॥
मार्गप्रतीक्षा युगायुगाची ।
नयनीं वलयें उरलीं साचीं
भरलेलीं तीं मम तेजाचीं ।
त्यांतुनि वाहे नीर । येउनी ॥ १ ॥

सूर्यप्रभेच्या तेजासंगें ।
द्विजगानाच्या गजरासंगें ।
वसंतऋतुच्या शोभेसंगें ।
ये सुटतो मम धीर । येउनी ॥ २ ॥
पल्लव वेली जमवुनि केली ।
कुटि तुजसाठीं रे वनमाळी ।
तुझ्याचसाठीं शय्यासन हें ।
तुझेंच हें मंदीर । येउनी ॥ ३ ॥
आम्ल मधुर हीं फळें विरंगीं ।
जमवुनि सारीं द्रोणीं भरलीं ।
तव उपहारा आतुर बनलीं ।
तव स्पर्शास अधीर ॥ ४ ॥
नयन-जलानें तुजला न्हाणिन ।
भक्तिप्रेमें तुज आलिंगिन ।
तुझ्याच हृदयीं बंदी होइन ।
खुशाल मग तूं फीर । येउनी ॥ ५ ॥

४२

पाडुरंग श्रीरंग भज रे मना ॥ ध्रु० ॥
अमोलिक जातें वय । आतां तरी धरीं सोय ।
असा काय नरदेह येइल पुन्हां । बा, येइल पुन्हां ॥ १ ॥
रात्रंदिन करिसी मजा । पुढें येइल यमराजा ।
हरून नेइल प्राण तुझा । निजसदना बा, निज सदना ॥ २ ॥
विषयांचें सुख द्वाड । येथें वाटे बहु गोड ।
पुढें आहे अवघड । यमयातना बा, यमयातना ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें करा । हरिचरण दृढ धरा ।
चुकेल चौऱ्यायशीचा फेरा । तुझिया प्राणा
बा, तुझिया प्राणा ॥ ४ ॥

४३

धाव पाव सावळे विठाबाइ, कां मनिं धरिली अढी ।
विठाबाइ कां मनिं धरली अढी ॥
अनाथ मी अपराधी स्मरतों । उतरा पैल तडीं ॥ १ ॥
एकनाथा घरिं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी । विठावाइ ।
कबिराचे ते शेले विणुनी, त्यांची घालिसि घडी ॥ २ ॥
जनाबाइचीं लुगडीं धुतलीं, चंद्रभागेच्या तडीं ।
नरसि मेहत्याची हुंडि पटवुनी त्याचा झालासि गडी ॥ ३ ॥
सांवता माळ्याची भाजी खुडुनी, त्याची बांधिसि जुडी ।
सजन कसाई मांस विकीतो त्याची बांधिसि घडी ॥ ४ ॥
दामाजीपंताचे वेळीं झाला महार तांतडी । विठोबा ।
पायिं वहाणा हातीं काठी खांद्यावरि घोंगडी ॥ ५ ॥
चोखामेळ्याचे घरीं येउनी ओढि ढोरें तांतडी । विठाबाई ।
त्याची स्त्री बहु हाका मारी, कोठें दिधलिस दडी ॥ ६ ॥
गजेंद्राचा धांवा ऐकुनि वेगें घालिसि उडी । विठाबाई ।
अर्जुनरथिं सारथ्य करुनी फेडि त्याचिं सांकडीं ॥ ७ ॥

४४

विठ्ठल तो आला आला मला भेटण्याला ॥
तुळसीमाळ घालुनि गळां ।
कधीं नाहिं कुटले टाळ ।
पंढरिला नाहीं गेलें
चुकूनियां एक वेळ
देव्हाऱ्यांत माझे देव
ज्यांनीं केला प्रतिपाळ ।
चरणींची त्याच्या धूळ
रोज लावी कपाळाला ॥ १ ॥

सत्यवाचा माझी होती
वाचली न गाथा पोथी ।
घालिं पाणि तूळशीला
आगळीच माझी भक्ति ।
शिकवण जन्माची ती
बंधुभाव सर्वा भूतीं ।
विसरुनि धर्मजाति
देई घास भुकेलेल्या ॥ २ ॥

४५

मजवरी दया करा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

संत जेणें व्हावें, नीच बोलणें सोसावें ।
तरीच अंगीं संतपण, जया नाहीं अभिमान ।
संतपण जेथ वसे, भूतदया तेथें दिसे ।
रागें भरावें कवणासी, आपण ब्रह्म सर्वदेशीं ।
ऐसी समदृष्टि करा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

योगी पावन मनाचा, साहे अपराध जनांचा ।
विश्व जाहलिया वन्ही, संतमुखें वहावें पाणी ।
शब्दशस्त्रें झाले क्लेश, संतीं मानावा उपदेश ।
विश्व पट ब्रह्म दोरा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

लडिवाळ मुक्ताबाई, बीज मुद्दल ठायीं ठायीं ।
तुम्ही तरोनी विश्व तारा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

४६

लाभला महात्मा नेता

लाभला महात्मा नेता । धन्य भारता । नेता ।। ध्रु० ।।

प्रेममार्ग अनुसरितो तो । विश्व जिंकिता । जेता ।। १ ।।

सत्यरूप मानी ईशा । मोह-पंक गणि जो हिंसा ।
हिंदुधर्म उद्धरि कैसा । प्रेम दाविता । पतिता ।। २ ।।

पुण्यभूमि भारतमाते । धन्य तनय लाभति तूतें ।
चिरंजीवि राखायातें । विनति ही पदा ।। ३ ।।

४७

देह असें यंत्र । मी तों यंत्री आत्मा ।
निश्चळ ही प्रमा । संपादावी ।। १ ।।

अहंता न देहीं । कधीं बुद्धि द्यावी ।
विवेकें स्थापावी । आत्म्यामाजी ।। २ ।।

अवश्य यंत्रास । स्नेहन तें देणें ।
जरी काम घेणें । त्यापासोनी ।। ३ ।।

स्नेहनीं न युक्त । त्याग किंवा राग ।
युक्त ती निःसंग । कार्य-दृष्टि ।। ४ ।।

अस्वाद साधाया । मुख्य हें विज्ञान ।
जाऊं त्या शरण । विन्या म्हणे ।। ५ ।।

४८

ब्रह्मचर्य हें पाळावें काया वाचा मनें ।
चित्त साह्य केल्यावीण विफल साधनें ॥ १ ॥
बाह्य अंकुशांत काय राखुनी शरीर ।
जरी अंतरीं प्रीतीनें पोषिला विकार ॥ २ ॥
वरी वरी संयम केला वृत्ति सोडी स्वैर ।
अनुभवाचें शास्त्र त्यास म्हणे मिथ्याचार ॥ ३ ॥
देह-दमनें तो हानि मोकाटितां मन ।
मनामागें जाय अंतीं विन्या म्हणे तन ॥ ४ ॥

४९

या भारतांत बंधुभाव नित्य वसूं दे ।
प्रभु, वरचि असा दे ॥
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसूं दे ।
मतभेद नसूं दे ॥ ध्रु० ॥
नांदोत सुखें गरीब अमीर एक मतांनीं ।
मग हिंदु असो मुस्लिम वा हो खिस्तानी ।
स्वातंत्र्य सुखा या सकलां माजि वसूं दे । दे वर० ॥ १ ॥
सकलांस कळो मानवता राष्ट्र-भावना ।
हो सर्व स्थळीं मिळुनी समुदाय प्रार्थना ।
उद्योगि तरुण शीलवान वीर दिसूं दे । दे वर ॥ २ ॥
हा जातिभाव विसरुनियां एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगांतुनी ।
खळ निंदकां मनीं हि सत्य न्याय वसूं दे । दे वर० ॥ ३ ॥
सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गिच्या परी ।
ही नष्ट होऊं दे विपत्ति भीति बोहरी ।
तुकड्यास सदा सर्वदा सेवेस कसूं दे ।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

५०

आम्हि सर्व सुखी हो म्हणुनी प्रार्थु ईश्वरा ।
आम्हांत नको गरीब अमीर भेद हा जरा ॥ ध्रु० ॥

कष्ट करुनि राबुं आम्ही आमुच्यापरी ।
ईश-स्मरणांत सदा झिजवुं वैखरी ।
हीन-दीन कोणि नसो देशमंदिरीं ॥ १ ॥

जो कसेल भूमि तया भूमि देउनी ।
जो करील काम तया काम पुरवुनी ।
सर्व मिळुनी सेवूं धन धान्य-कोठरा ॥ २ ॥

मित्रता परस्परांत वाढवूं अम्ही ।
दुष्टबुद्धि दुर्व्यसना करुनियां कमी ।
तुकड्याची आस पुरविं विनवुं श्रीधरा ॥ ३ ॥

५१

मंगलमय नाम तुझें सतत गाउं दे ।
दुर्बल या हृययांतून । चंचल या चित्तांतून ।
झुरझुरत्या नेत्रांतून । स्वरूप पाहुं दे ॥ १ ॥

अंधाऱ्या घोर वनीं । विषयांच्या कांट्यांतुनि ।
चौऱ्यायशी गोष्ट्यांतुनि । पार होउं दे ॥ २ ॥

संतांची बोधधुळी । लागो या देह-कुळीं ।
भक्तीच्या प्रेमजळीं । मस्त होउं दे ॥ ३ ॥

मन्मानस मंदिरांत । सिंहासन तव प्रशांत ।
सोहंध्वनि गात गात । रंगिं रंगुं दे ॥ ४ ॥

भवसागर कठिण घोर । षड्रिपु हे ग्राह थोर ।
तुकड्याची नाव स्थिर । पार होऊं दे ॥ ५ ॥

५२

आम्ही देशाचे मजूर । आम्ही देवाचे मजूर ॥
कष्ट करूं भरपूर ॥ ध्रु० ॥

बाहेरिल ही शेति करून । धनधान्यांनीं तिला नटवुन ।
फळांफुलांनीं तिला हसवुन । दुष्काळा करूं दूर ॥ १ ॥

हृदयांतिल ही शेति करून । प्रेमदयेचे मळे पिकवुन ।
समानता शीलाला निर्मुन । सौख्या आणूं पूर ॥ २ ॥

घाण सकल ही करुनी दूर । रोगराइ ती हरुनी दूर ।
स्वर्ग निर्मु तो या जगतीवर । बदलूं सारा नूर ॥ ३ ॥

दिवसभरि असे कष्ट करून । जाऊं घामाघुम होऊन ।
रात्रीं जाऊं भजनिं रमून । भक्तीचा धरूं सूर ॥ ४ ॥

कर्मामध्यें नित्यानंद । सेवेमध्यें दिव्यानंद ।
आणि कशाचा नाहीं छंद । नाहीं कांहीं जरूर ॥ ५ ॥

—साने गुरुजी

५३

जन्म-मरणाचीं पाउलें टाकीत ।
येत मी धांवत भेटावया ॥ १ ॥

पापांचे पर्वत सोडुनियां दूर ।
आलों तुझें दार गांठावया ॥ २ ॥

दिवसेंदिवस होऊनी निर्मळ ।
चरण-कमल पाहिन तूझें ॥ ३ ॥

कधीं तो सोन्याचा येईल दिवस ।
मिळेल ही आस अंतरींची ॥ ४ ॥

—साने गुरुजी

५४

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावें ॥ ध्रु० ॥
जगीं जे हीन अति पतित । जगीं जे दीन पददलित ।
तयां जाऊनि उठवावें । जगाला० ॥ १ ॥
जयांना कोणि ना जगतीं । सदा जे अंतरीं रडती ।
तयां जाऊनि हंसवावें । जगाला० ॥ २ ॥
समस्तां धीर तो द्यावा । सुखाचा शब्द बोलावा ।
अनाथां साह्य तें द्यावें । जगाला० ॥ ३ ॥
प्रभूचीं लेकरें सारीं । तयाला सर्व हीं प्यारीं ।
कुणा ना तुच्छ लेखावें । जगाला० ॥ ४ ॥
कुणा ना व्यर्थ शिणवावें । कुणा ना व्यर्थ हिणवावें ।
समस्तां बंधु मानावें । जगाला० ॥ ५ ॥
असे जें आपणापाशीं । कला वा वित्त वा विद्या ।
सदा तें देतची जावें । जगाला० ॥ ६ ॥
जिथें आलस्य नैराश्य । जिथें अंधार औदास्य ।
प्रकाशा तेथ नव न्यावें । जगाला प्रेम अर्पावें ॥ ७ ॥

—साने गुरुजी

५५

असो तुला देवा माझा सदा नमस्कार ।
तुझ्या दयादातृत्वाला अंत नाहिं पार ॥ ध्रु० ॥
तुझ्या कृपेनें रे होतिल फुलें फत्तरांचीं ।
तुझ्या कृपेनें रे होतिल मोतिं मृत्तिकेचीं ।
तुझ्या कृपेनें रे होतिल सर्प रम्य हार । असो० ॥ १ ॥
तुझ्या कृपेनें रे होइल उषा त्या निशेची ।
तुझ्या कृपेनें रे होइल सुधा त्या विषाची ।
तुझ्या कृपेनें रे होइल पंगु सिंधुपार । असो० ॥ २ ॥

तुझ्या कृपासिंधूमधला बिंदु जरि मिळेल ।
तरी प्रभो शत-जन्मींची तृषा मम शमेल ।
तुझ्या म्हणुनि आलों राया बघत बघत दार । असो० ॥ ३ ॥

—साने गुरुजी

५६

प्रभु सतत मदंतर हासू दे ॥ ध्रु० ॥
तुझ्या कृपेचा वसंतवारा ।
जीवनवनिं मम नाचूं दे ॥
विश्वग्रंथीं पानीं पानीं ।
लिखित तुझें मज वाचूं दे ॥
सकलाकारीं तुजला पाहुनि ।
उचंबलुन मन जाऊं दे ॥

—साने गुरुजी

५७

प्रभू माझी जीवनबाग सजव ॥ ध्रु० ॥
कुशल तूं माळी । बाग सांभाळीं । स्वर्गीय सौंदर्ये ती रे खुलव ॥ १ ॥
गत-काळांतिल । सगळा खळमळ । भरपूर येथें खताला सडव ॥ २ ॥
द्वेष-मत्सर । हेची फत्तर । फोडूनी प्रेमाचे वृक्ष फुलव ॥ ३ ॥
काम-विकार । बाग खाणार । वैराग्यदंडानें त्याला घालव ॥ ४ ॥
दृढ श्रद्धेचे । सद्भक्तीचे । सुंदर मांदार येथें डुलव ॥ ५ ॥
उत्साहाचीं । आनंदाचीं । थुई थुई कारंजीं येथें उडव ॥ ६ ॥
धृतिचे अभिनव । घालुनी मांडव । त्यावर शांतीचे वेल चढव ॥७॥
चारित्र्याचे । पावित्र्याचे । शीतल शांतसे कुंज घडव ॥ ८ ॥
बाग सजवुनी । तेथें निवसुनी । गोड गोड मग मुरली वाजव ॥ ९ ॥

—साने गुरुजी

५८

वैर करूं कोणासी । दयाळा ।
नामा रूपीं नाना देहीं । सन्मुख तूंची दिससी ॥ ध्रु० ॥
भयकृत् भयनाशन वदती तुज । शिव तूं रुद्रहि होसी ॥ १ ॥
अमृत-गरळ तूं, नक्र-कमळ तूं । शिव तूं रुद्र हि होशी ॥ २ ॥
भक्तां गांजिशी सत्त्व परीक्षुनी । अंतीं हृदयीं धरिशी ॥ ३ ॥
दुर्वासें विश्वस्तुत केला । अंबरीष राजर्षि ॥ ४ ॥
कोठें सुलभ-दर्शन हि कोठें । उमजसि बहुलायासीं ॥ ५ ॥
गुरुजन वत्सल तोही भासे । यमसा बालमतीशीं ॥ ६ ॥
शठ-खल-निंदक प्रभुचीं रूपें । खूण कळे सन्मतिशीं ॥ ७ ॥
सर्वांभूतीं पूजिन तुजला । दे मति मज मूढासी ॥ ८ ॥

५९

आनंदें रमुं या । जगतिं या ॥ ध्रु० ॥

आनंदानें जग हें भरलें ।
सौंदर्यानें खुलुनी उठलें ।
सज्जनतेनें पावन बनलें ;
प्रभुची थोर दया स्मरूं या ॥ १ ॥

पक्षिगणाचें मंजुळ गायन ।
वृक्षलतांचें शीतल उपवन ।
नगराजींचें दृढ संरक्षण ।
लाभे प्रभुतनयां जगतिं या ॥ २ ॥

बालक्रीडा मन हर्षविती ।
ललना-लीला वर्णाव्या किति ।
वीरचरित्रें रोम उठविती ।
अद्भुत ही दुनिया ॥ ३ ॥

भूमाता ही थोर उदारा ।
अल्पायासें दे फलभारा ।
घामाच्या तिज वाहूं धारा ।
उद्योगा वरुं या ॥ ४ ॥

पाषाणांतुनि वाहे निर्झर ।
कांट्यांतूनि ये पुष्प मनोहर ।
काष्ठ रगडितां गळते साखर ।
कशि हरिची किमया ॥ ५ ॥

विश्व थोर विद्यालय हरिचें ।
पाठ गिरवुनी सुखदुःखाचे ।
मार्ग आक्रमूं आत्मोन्नतिचे ।
हीच खरी विद्या ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ११७६१

६०

( चाल—आकळे न अघटित० )

ठेविशील तैसे राहूं । कष्ट मानुं ना । देवा ॥
भाव जाणसी तूं मनिंचे । सुखदुःख देणें तूझें ।
पथ्य तोंचि तेव्हां देशी । भरंवसा मना ॥ १ ॥

तूंचि मित्र बंधू माता । आप्त पुत्र कन्या कांता ।
देसि तूंचि नेसी जैसी । गूढ योजना ॥ २ ॥

मिरवुं कधीं अंबारींत । भार वाहुं कधिं तापांत ।
कधिं उपाशि सेवूं केव्हां । मिष्ट-भोजना ॥ ३ ॥

व्यंग रुग्ण अथवा जीर्ण । राहुं वर्षशत ही पूर्ण ।
या क्षणींहि अथवा येऊं । स्वामिदर्शना ॥ ४ ॥

काम-क्रोध रिपु दंडावे । सत्य वचन मुखिं नांदावें ।
सर्व जन सखेसे व्हावे । हीच वासना ॥
देवा नान्य कामना ॥ ५ ॥

६१

प्रेमरसाची । लागली चटक मद्याची ॥ ध्रु० ॥

लज्जत एकचि वेळ चाखिली । नित्यचि परि ती अंतरिं ठसली ॥
संगत सद्गुरुचीच भोंवली । संतजनाची ॥ १ ॥

एकचि रस हा निशिदिनिं व्हावा । पिउनि स्वयें अन्यां पाजावा ॥
धनगेहाची नुरली पर्वा । जनलज्जेची ॥ २ ॥

भेद निमाला स्व-पर जनाचा । उच्च यातिचा चांडाळाचा ।
काळा गोरा पीत हि अमुचा । प्राणसखाची ॥ ३ ॥

निजसत्तेची कवडी नुरली । तनु परसेवा कर्मीं खपली ।
परान्न खातां वृत्तिहि जिरली । अभिमानाची ॥ ४ ॥

झालें मातेरें जन्माचें । भय तरि मग कैंचें मृत्यूचें ।
करूं अवज्ञा हस्तें वाचे । दुःसत्तेची ॥ ५ ॥

निज-देहाचें भान विसरलों । पीतांबर कीं चिंधी ल्यालों ।
राजभवनिं कारागृहिं दडलों । खंत न त्याची ॥ ६ ॥

ओळख नाहीं स्त्रीभगिनीची । किति वर्णावें निजजननीची ।
तरुणी वृद्धा निज-परगृहिंची । मम माताची ॥ ७ ॥

ममता केली स्त्रीपुत्रांशीं । देशबांधवां निजयातीशीं ।
चटक भुलविण्या शक्ति न तिजशीं । या कैफाची ॥ ८ ॥

६२

हरि तुझी आवडि मजला देईं ॥ ध्रु० ॥

कृपाकटाक्षें पाहूनि मजकडे ।
अहंममता मम नेईं ॥ १ ॥

भोग घडोत जसे कपाळीं ।
तद्वर तुजवरि नाहीं ॥ २ ॥

धांवत वृत्ति चहूंकडे तिजशीं ।
तुजवीण न दिसो कांहीं ॥ ३ ॥
निज भक्तांचा हाचि मनोरथ ।
पुरवुनि सेवा घेईं ॥ ४ ॥

६३

तूं माझा यजमान रामा । ध्रु० ॥
जननीजठरीं रक्षियलें मज ।
पोसुनि पंचहि प्राण ॥ १ ॥
बाहेर निघतां मातेचे स्तनीं ।
पय केलें निर्माण ॥ २ ॥
ऐसें असतां या पोटाची ।
कां करुं चिंता जाण ॥ ३ ॥
मध्वमुनीश्वर स्वामी रमापति ।
धरि याचा अभिमान ॥ ४ ॥

६४

## वैष्णवजन*

वैष्णव जन तरी त्यासि म्हणावें जो परपीडा जाणे रे ।
परदुःखीं उपकार करी तरि, मनिं अभिमान आणी रे ॥ १ ॥
सकल जनीं सकलांसी वंदी निंदा न करि कुणाची रे ।
वाचा तनुमन निश्चल राखी धन्य तयाची जननी रे ॥ २ ॥
समदृष्टी जो तृष्णा त्यागी परकांता ज्या माता रे ।
अनृत वचना वदे न रसना कर न परधना स्पर्शी रे ॥ ३ ॥
मोह व माया व्यापिति नच ज्या दृढ वैराग्य वसे मनिं रे ।
रामनामीं समाधि लागे सारीं तीर्थें शरिरीं रे ॥ ४ ॥
लोभकपटविरहित जो निश्चळ काम क्रोध निवारी रे ।
म्हणे नरसैया दर्शन त्याचें कुळें एकात्तर तारी रे ॥ ५ ॥

* मूळ गुजराथीचें भाषांतर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

# पद्यें गुजराथी*

६५

वैष्णवजन तो तेने कहिये
जे पीड पराई जाणे रे ।
परदुःखे उपकार करे तोये
मन अभिमान न आणे रे ॥ १ ॥

सकल लोकमां सहुने वंदे
निंदा न करे केनी रे ।
वाच काछ मन निश्चळ राखे
धन धन जननी तेनी रे ॥ २ ॥

समदृष्टि ने तृष्णात्यागी
परस्त्री जेने मात रे ।
जिव्हा थकी असत्य न बोले
परधन नव झाले हाथ रे ॥ ३ ॥

मोहमाया व्यापे नहि जेने
दृढ वैराग्य जेना मनमां रे ।
राम नामशुं ताली लागी
सकल तीरथ तेना तनमां रे ॥ ४ ॥

वणलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध
निवाऱ्या रे ।
भणे नरसैय्यो तेनुं दरसन करतां
कुल एकोत्तरे ताऱ्या रे ॥ ५ ॥

---

* भाषांतरासाठीं पद्य ६४ वें पहा.

६६

एक ज दे चिनगारी[1] । महानल[2] ॥ ध्रु० ॥

चकमक लोढुं[3] घसतां घसतां
अरची जिंदगी[4] सारी ।
जामगरीमां[5] तणखो[6] न पड्यो
न फळी मेहनत मारी ॥ १ ॥

चांदो सळग्यो[7], सूरज सळग्यो
सळगी आभ अटारी
ना सळगी इक सगडी मारी
वात विपतनी भारी ॥ २ ॥

ठंडीमां मुज काया थथरे,
जूटी[8] धीरज मारी ।
विश्वानल हूं अधिक न मागूं,
मागूं एक चिनगारी ॥ ३ ॥

६७

मंगल मंदिर खोलो । दयामय ॥ ध्रु० ॥

जीवन-वन अति वेगे वटाव्युं[9],
द्वार उभो शिशु भोळो ॥ १ ॥

तिमिर गयुं ने ज्योति प्रकाश्यो
शिशुने उरमां लो लो ॥ २ ॥

नाम मधुरतम रट्यो निरंतर,
शिशुसह प्रेमे बोलो ॥ ३ ॥

दिव्य-तृषातुर आव्यो बालक,
प्रेम अमीरस ढोळो[10] ॥ ४ ॥

---

१ ठिणगी. २ मोठा अग्नि. ३ लोखंड. ४ जन्म. ५ चकमक. ६ काडी. ७ पेटला. ८ संपली. ९ पार पाडलें. १० ओत.

६८

जूनूं थयुं[१] रे देवळ जूनूं थयूं
मारो[२] हंसलो नानो[३] ने देवळ जूनूं थयुं ॥ ध्रु० ॥
आ रे काया रे हंसा, डोलवाने लागी रे।
पडी गया दांत, मांयली[४] रेखुं तो रह्यु ॥ १ ॥
तारे ने मारे हंसा, प्रीत्युं बंधाणी रे।
उडी गयो हंस पांजर[५] पडी रे रह्युं ॥ २ ॥
बाई मीराकडे छे प्रभु गिरिधरना गुण।
प्रेमनो प्यालो तमने पाऊं[६] ने पीऊं ॥ ३ ॥

६९

अंतर मांथी नहीं रे विसारूं हरी ॥ ध्रु० ॥
जल जमुनाना पाणी रे जातां
सिरपर मटकी धरी ॥ १ ॥
आवतां ने जातां मारगवच्चे
अमुलख वस्तु जडी[७] ॥ २ ॥
मोरमुकुट ने काने रे कुंडल
मुखपर मोरली धरी ॥ ३ ॥
पळा पतांबर जरकसी जामा
केसर आड करी ॥ ४ ॥
बाई मीरा कहें[८] प्रभु गिरिधरना गुण
विठ्ठलवरने वरी[९] ॥ ५ ॥

---

१ झालें. २ माझा. ३ लहान. ४ आंतील. ५ पिंजरा. ६ पाजूं. ७ सापडली. ८ म्हणते. ९ लग्न केलें.

## पद्य हिंदी

७०

पायो जी मैने रामरतन धन पायो ॥ ध्रु० ॥

वस्तु अमोलिक दी मेरे सतगुरु ।
किरपा[१] कर अपनायो[२] ॥ १ ॥

जनम जनमकी पूँजी[३] पाअी ।
जगमें सभी खोवायो[४] ॥ २ ॥

खरचै न खूटे[५]; बाको[६] चोर न लूटैं ।
दिन दिन बढत[७] सवायो ॥ ३ ॥

सतकी नाव खेवटिया[८] सतगुरु ।
भवसागर तर आयो ॥ ४ ॥

मीराके प्रभु गिरिधर नागर ।
हरख[९] हरख जस[१०] गायो ॥ ५ ॥

७१

मेरे तो गिरिधर गोपाल दूसरा न कोई ।
दूसरा न कोई रे साधो सकल लोक जोई[११] ॥ ध्रु० ॥

भाई छोड्या बंधु छोड्या छोड्या सगा सोई[१२] ।
साधुसंग बैठ बैठ लोक-लाज खोई ॥ १ ॥

भगत देख राजी हुई जगत् देख रोई[१३] ।
अंसुवन[१४] जल सिंच सिंच प्रेम-बेलि बोई[१५] ॥ २ ॥

---

१ कृपा. २ पदरांत घेतला. ३ भांडवल. ४ हरवली. ५ संपते. ६ त्याला. ७ वाढते. ८ नावाडी. ९ हर्ष. १० यश, कीर्ति. ११ पाहिलें. १२ सोयरे. १३ रडल्यें. १४ अश्रु. १५ (वेल) लावली.

दधि मथ घृत काढि लियो, डार दई[१] छोई[२] ।
राणा विषको प्याला भेजो पीय मगन होई ॥ ३ ॥

अब तो बात फैल पडी जाणे सब कोई ।
मीरा एम लगण[३] लागी, होनी होय सो होई ॥ ४ ॥

७२

मेरे राणाजी, मै गोविंदगुण गाना ॥ ध्रु० ॥

राजा रूठे[४] नगरी रक्खे अपनी ।
मै हर रुठया कहां जाना ॥ १ ॥

राणे भेजा जहर प्याला
मै अमृत कह[५] पी जाना ॥ २ ॥

डवियामें[६] काला नाग भेजा
मै शालग्राम कर जाना ॥ ३ ॥

मीराबाई प्रेमदीवानी[७]
मै सावरिया[८] वर पाना ॥ ४ ॥

७३

माई मैने गोविंद लीनो मोल ॥ ध्रु० ॥

कोई कहे सस्ता, कोई कहे महंगा
लीनो तराजू तोल ॥ १ ॥

कोई कहे घरमें, कोई कहे बनमें
राधा के संग खिलोल[९] ॥ २ ॥

मीरा के प्रभु गिरिधर नागर
आवत[१०] प्रेम के डोल ॥ ३ ॥

---

१ टाकून दिली. २ ताक. ३ लग्न लागलें. ४ रागावला. ५ म्हणून. ६ करंडींत. ७ वेडी. ८ सांवळा. ९ खेळतो. १० येतात.

७४

म्हाने चाकर राखो जी।
गिरिधारी ललो, चाकर राखो जी ॥ ध्रु० ॥

चाकर रहसूं, बाग लगासूं, नित उठ दरसन पासूं।
वृंदावनकी कुंजगलिनमें गोविंदलीला गासूं॥ १ ॥
चाकरीमें दरसन पाऊं, सुमिरन पाऊं खरची।
भाव-भगति जागीरी पाऊं, तीनों बातां सरसी ॥ २ ॥
मोरमुकुट पीतांबर सोहे, गल बैजंती माला।
वृंदावनमें धेनु चरावे, मोहन मुरलीवाला ॥ ३ ॥
उंचे उंचे महल बनावूं बिचबिच[1] राखूं बारी[2]।
सांवरिया के दरसन पाऊं, पहिर[3] कुसुंबा सारी ॥ ४ ॥
जोगी आया जोग करनकूं, तप करने संन्यासी।
हरिभजनकूं साधू आये, वृंदावनके वासी ॥ ५ ॥
मीरांके प्रभु गहिर गँभीरा, हृदे रहो जी धीरा।
आधी रात प्रभु दरसन दीन्हो जमुनाजीके तीरा ॥ ६ ॥

७५

( चाल—प्रभु माझी जीवनबाग )

प्रभु मेरी नाव किनारे लगाव
हरि मेरी नाव किनारे लगाव ॥ ध्रु० ॥
नदियां गहरीं नाव पुरानी।
डुबत जहाज तराव ॥ १ ॥
ज्ञान ध्यानकी बात न जानूं।
दौडे दौडे आव ॥ २ ॥
मीराके प्रभु गिरिधर नागर।
मै तेरे पकडूं पांव ॥ ३ ॥

---

१ मध्यें मध्यें, २ खिडक्या, ३ नेसून.

७६

तूं दयालु दीन हौं तू दानी हौं भिखारी
हौं प्रसिद्ध पातकी तू पापपुंजहारी ।। ध्रु० ।।

नाथ तू अनाथको अनाथ कौंन मोसो[१] ।
मोसमान आरत नहि आरतहर तोसों ।। १ ।।

ब्रह्म तूं हौं जीव, तू ठाकुर[२] हौं चेरो[३] ।
तात मात गुरु सखा तू सब विधहि तू मेरो ।। २ ।।

तोहिं मोहिं नाते अनेक मानिये जो भावै ।
ज्यों त्यों तुलसी कृपालु चरन-सरन[४] पावै ।। ३ ।।

७७

जागिये रघुनाथ कुंवर । पंछी[५] बोले ।। ध्रु० ।।

चंद्रकिरण शीतल भई । चकई[६] पियमिलन[७] गई ।
त्रिविध मंद चलत पवन । पल्लव-द्रुम डोले ।। १ ।।

प्रातभानु प्रकट भयो । रजनीको तिमिर गयो ।
भृंग करत गुंजगान । कमलन दल खोले ।। २ ।।

ब्रह्मादिक धरत ध्यान । सुरनर मुनि करत गान ।
जागनकी बेर[८] भई । नयन-पलक[९] खोले ।। ३ ।।

तुलसिदास अति आनंद । निरखि के मुखारविंद[१०] ।
दीननको देत दान । भूषण बहुमोले ।। ४ ।।

---

१ माझ्याहून. २ धनी. ३ नोकर. ४ पायांचें रक्षण. ५ पक्षी ६ चक्रवाक पक्षीण. ७ नवऱ्याला. ८ वेळ. ९ पापणी. १० मुख-कमल.

७८

रघुवर तुमको मेरी लाज ॥ ध्रु० ॥
सदा सदा मै सरन तिहारी
तुम बडे गरीबनिवाज ॥ १ ॥
पतित उधारन बिरुद तिहारो
स्रवनन[1] सुनी[2] अवाज ॥ २ ॥
हौं तो पतित पुरातन कहिये
पार उतारो जहाज ॥ ३ ॥
अघ-खंडन[3] दुख-भंजन जनके
यही तिहारो काज ॥ ४ ॥
तुलसिदासपर किरपा करिये
भक्तिदान देहु आज ॥ ५ ॥

७९

कलि नाम कामतरु राम को ॥ ध्रु० ॥
दलनिहार[4] दारिद दुकाल दुख
दोष घोर घनघाम[5] को ॥ १ ॥
नाम लेत दाहिनो[6] होत मन
वाम[7] विधाता[8] वामको ॥ २ ॥
कहत[9] महेश मुनीस महातम
उलटे सूधे[10] नामको ॥ ३ ॥
भलो लोक परलोक तासु
जाके बल ललित ललाम को ॥ ४ ॥
तुलसी जग जानियत नाम ते
सोच[11] न कूच मुकामको ॥ ५ ॥

---

१ कानांनीं. २ ऐकून. ३ पाप-निवारण. ४ नष्ट करणारे. ५ उष्मा, ऊन. ६ शांत. ७ वाईट. ८ करणारे. ९ म्हणतात. १० सरळ. ११ विचार कर.

८०

चरन-कमल बंदौ हरिराई ॥ ध्रु० ॥

जाकी कृपा पंगु गिरि लंघै
अंधेको सब कुछ दरसाई ॥ १ ॥

बहिरो सुनै मूक पुनि बोलै
रंक चलै सिर छत्र धराई ॥ २ ॥

सूरदास स्वामी करुणामय
बार बार बंदौं तेहि पाई ॥ ३ ॥

८१

## वृक्ष उपदेश

( चाल–स्मरतां नित्य हरी )

वृक्षनसे मत[1] ले, मन तूं वृक्षनसे मत ले ॥ ध्रु० ॥
काटे वाको[2] क्रोध न कर ही ।
सिंचत न करही नेह[3] ॥ १ ॥

धूप[4] सहत अपने सिर ऊपर ।
और को छांह[5] करेत । मन तू ।

जो वाही को पथर चलावे ।
ताही को फल देत । मन तू ॥ २ ॥

धन्य धन्य ये पर-उपकारी ।
वृथा मनुजकी देह
सूरदास प्रभु कह लगिं वरनौ[6]
हरिजन[7] की मत ले । मन तू ॥ ३ ॥

१ मति. २ त्याला. ३ प्रेम. ४ उन. ५ छाया. ६ वर्णू. ७ सज्जन.

८२

दीनन दुखहरन देव संतन हितकारी ॥ ध्रु० ॥

अजामील गीध[१] ब्याध, इनमें कहो कौन साध[२] ।
पंछीको पद पढात, गणिकासी तारी ॥ १ ॥
ध्रुवके सिर छत्र देत, प्रल्हादको उबार[३] लेत ।
भक्तहेत बांध्यो सेत, लंकापुरी जारी[४] ॥ २ ॥
तंदुल देत रीझ[५] जात, सागपात[६] सो अघात[७] ।
गिनत नहीं जूठे[८] फल खाटे मीठे खारी ॥ ३ ॥
गजको जब ग्राह ग्रस्यो, दुःशासन चीर[९] खस्यो ।
सभा बीच कृष्ण कृष्ण द्रौपदी पुकारी ॥ ४ ॥
इतने हरि आय गये बसनन[१०] आरूढ भये ।
सूरदास द्वारे ठाढो[११] आंधरो भिखारी ॥ ५ ॥

८३

सुनेरी[१२] मैंने निर्बल के बलराम ।
पिछली[१३] साख[१४] भरूँ संतनकी
आडे[१५] संवारे[१६] काम ॥ ध्रु० ॥
जबलग[१७] गज बल अपनो बर्त्यो
नेक[१८] सर्यो नही काम ।
निर्बल व्है बल राम पुकार्यो
आये आधे नाम ॥ १ ॥
द्रुपदसुता निर्बल भयि ता दिन
गहलाये[१९] निज धाम ।

---

१ गिधाड ( जटायु ). २ साधु. ३ उचलणें. ४ जाळली. ५ संतुष्ट होतो. ६ भाजीचें पान. ७ तृप्त होतो. ८ उष्टीं. ९-१० वस्त्रें. ११ उभा राहिला. १२ ऐकलें. १३ मागील. १४ साक्ष. १५ अडचणींत. १६ संभाळलें. १७ जोंवर. १८ किंचित्‌हि. १९ आणलें.

दुःशासनकी भुजा थकित भई
वसनरूप भये श्याम ॥ २ ॥

अप-बल तप-बल और बाहुबल
चौथा है बल दाम ।
सूर किशोर कृपासे सबबल
हारे को हरिनाम ॥ ३ ॥

८४

मोसम कौन कुटिल खल कामी ।
जिन तनु दियो ताहि बिसरायो
ऐसो निमकहरामी ॥ ध्रु० ॥

भरि भरि उदर विषयको धावो
जैसे सूकर ग्रामी ।
हरिजन छांड हरि विमुखन की
निस दिन करत गुलामी ॥ १ ॥

पापी कौन बडो है मोतें
सब पतितनमें नामी ।
सूर पतितको ठोर[१] कहा है
सुनिये श्रीपति स्वामी ॥ २ ॥

८५

सबसे ऊंची प्रेमसगाई[२] ।
दुर्योधन को मेवा त्यागो साग[३] विदुरघर पाई ॥ ध्रु० ॥

जूठे[४] फल सबरी के खाये बहुविधि प्रेम लगाई ।
प्रेमके बस नृप-सेवा कीन्हीं आप भये हरि नाई[५] ॥ १ ॥

---

१ आश्रय. २ नातें. ३ भाजी. ४ उष्टीं. ५ न्हावी.

राजसुयज्ञ युधिष्ठिर कीन्हो तामें जूठ उठायी ।
प्रेमके बस अर्जुन रथ हाक्यो भूल गये ठकुराइं[१] ॥ २ ॥
ऐसी प्रीति बढी[२] वृंदावन गोपिन नाच नचाई ।
सूर कूर इस लायक नाहि कहँ लमि[३] करौं बड़ाई ॥ ३ ॥

८६

अब तो प्रगट भई जग जानी ।
वा मोहनसों प्रीति निरंतर
नही रहेगी छानी[४] ॥ ध्रु० ॥
कहां कहौं सुंदर मूरत इन
नयनन मांझ समानी[५] ।
निकसत[६] नाहि बहुत पचिहारी[७]
रोम रोम उरझानी[८] ॥ १ ॥
अब कैसे निर्वार जात है
मिले दूध ज्यों पानी ।
सूरदास प्रभु अंतर्यामी
ग्वालिन[९] मन की जानी ॥ २ ॥

८७

मन लागो मेरो यार फकीरी में ॥ ध्रु० ॥
जो सुख पायो रामभजनमें ।
सो सुख नाहिं अमीरीमें ॥ १ ॥
भला बुरा सबका सुनि लीजै ।
कर गुजरान गरीबीमें ॥ २ ॥

---

१ राजेपणा. २ वाढली. ३ कोठवर. ४ गुप्त. ५ सामावली. ६ निघत. ७ थकलों. ८ गुंतली. ९ गवळण.

प्रेमनगरमें रहनी हमारी ।
भली बनी आयी सबूरीमें ॥ ३ ॥

हाथमें कुंडा बगलमें सोटा
चारों दिसि जागीरीमें ॥ ४ ॥

आखिर यह तन खाक[१] मिलेगा
कहां फिरत मगरूरीमें ॥ ५ ॥

कहत कबीर सुनो भाई साधो
साहिब[२] मिले सबूरीमें ॥ ६ ॥

८८

भजो रे भैय्या । राम गोविंद हरी ॥ ध्रु० ॥
जप तप साधन कछु नही लागत,
खचरत नहि गठरी ॥ १ ॥
संतत संपत सुख के कारन,
जासे भूल परी ॥ २ ॥
कहत कबीरा जो मुख राम नही,
सो मुख धूली भरी ॥ ३ ॥

८९

झिनी झिनी झिनी झिनी बिनी चदरिया ॥ ध्रु० ॥
काहेका ताना काहेकी भरनी[३] ।
कौन तारसे बिनी चदरिया ॥ १ ॥
इंगला पिंगला ताना भरनी ।
सुषमन तारसे बिनी चदरिया ॥ २ ॥

---

१ माती. २ ईश्वर. ३ आडवण.

आठ[१] कँवल दस चरखा[२] डोले ।
पांच तत्त[३] गुण[४] बिनी चदरिया ॥ ३ ॥

साईं[५] को सीयत मास दस लगे ।
ठोक ठोक के बिनी चदरिया ॥ ४ ॥

सो चादर सुरनरमुनि ओढी[६] ।
ओढ के मेली किनी चदरिया ॥ ५ ॥

दास कबीर जतनसे ओढी ।
ज्यों की त्यों घर दिनी[७] चदरिया ॥ ६ ॥

९०

गुरुबिन कौन बतावे बाट ? ।
बडा विकट[८] यमघाट ॥ धु० ॥

भ्रांति की पहाडी[९] नदियां बीचमों[१०]
अहंकार की लाट ॥ १ ॥

काम क्रोध दो पर्वत ठाढे[११]
लोभ चोर संघात[१२] ॥ २ ॥

मद मत्सर का मेह[१३] बरसत
माया पवन बहे दाट ॥ ३ ॥

कहत कबीर सुनो भाई साधो
क्यों तरना यह घाट ॥ ४ ॥

---

१ नाभिकमलादिक कमलें. २ शरीरांतील चक्रें. ३ पंचमहाभूतें, तत्त्व = तत्त = तंतु. ४ सत्त्व, रज, तम हे तीन गुण, गुण = दोरी. ५ ईश्वराला. ६ पांघुरली. ७ अर्पण केली. ८ भयंकर. ९ डोंगर. १० मध्यें. ११ उभे. १२ टोळी. १३ ढग.

९१

सगझ बूझ दिल खोज[१] पियारे
आशक होकर सोना[२] क्यारे ॥ ध्रु० ॥

सूखा सूखा रामका टुकडा
चिकना[३] और सलोना[४] क्यारे ॥ १ ॥
जिन नैनोंसे नींद गँवाई
तकिया लेफ बिछौना क्यारे ॥ २ ॥
कहत कमाल प्रेमके मारग
सीस[५] दिया तब रोना[६] क्यारे ॥ ३ ॥

९२

इस तन धन की कौन बडाई[७]
देखत नैनोमें मिट्टी मिलाई ॥ ध्रु० ॥

अपने खातर महल बनाया
आप ही जाकर जंगल सोया[८] ॥ १ ॥
हाड जले जैसी लकडी की मोली
बाल[९] जले जैसी घासकी पोली[१०] ॥ २ ॥
कहत कबीरा सुन मेरे गुनिया
आप मुए[११] पीछे डुब गई[१२] दुनिया ॥ ३ ॥

९३

बिसर गई सब तात पराई[१३] ।
जबते साध-संगत मोहिं पाई ॥ ध्रु० ॥

ना को बैरी नाहि बिगाना[१४]
सकल संग हमको बनि आई[१५] ॥ १ ॥

---

१ तपास. २ झोपणें. ३ तुळतुळीत. ४ मिठाचा. ५ डोकें. ६ रडणें. ७ मोठेपणा. ८ झोपला. ९ केस. १० पेंढी. ११ मेला. १२ बुडाली. १३ परकेपणा. १४ परका. १५ पटतें.

जो प्रभु कीन्हो सो भल मान्यो
एहि सुमति साधू ते पाई ॥ २ ॥
सब महिं रम रहिया प्रभु एकै
पेखिपेखि[१] नानक बिगसाई[२] ॥ ३ ॥

९४

सुमरन[३] करले मेरे मन ।
तेरी बितिजाति[४] उमर हरिनाम बिना ॥ ध्रु० ॥
कूप नीरबिनु, धेनु छीरबिनु[५]
धरती मेहबिना[६] ।
जैसे तरुवर फलबिन हीना
तैसे प्राणी हरिनामबिना ॥ १ ॥
देह नैनबिन, रैन[७] चंद्रबिन
मंदिर दीपबिना ।
जैसे पंडित वेदविहीना
तैसे प्राणी हरिनामबिना ॥ २ ॥
काम-क्रोध मद लोभ निहारो[८]
छांड दे अब संतजनां ।
कहे नानकशा सुन भगवंता
या जगमें कोई नहि अपना ॥ ३ ॥

९५

गुरु कृपांजन पायो मेरे भाई
रामबिना कुछ जानत नाहीं ॥ ध्रु० ॥
अंतर राम हि बाहिर राम हि
जहँ देखों तहँ राम हि राम हि ॥ १ ॥

---

१ पाहून पाहून. २ हर्षित होतो. ३ स्मरण. ४ निघून जाते. ५ दूध. ६ पाउस. ७ रात्र. ८ निरखून पहा.

जागत राम हि सोवत[1] राम हि
सपनेमें देखों राजा राम हि ॥ २ ॥
एका जनार्दनीं भाव हि नीका[2]
जो देखों सो राम सरीखा ॥ ३ ॥

९६

प्रभुजी, तुम चंदन हम पानी ।
जाकी अंग अंग बास समानी ॥ ध्रु० ॥
प्रभुजी, तुम घन बन हम मोरा ।
जैसे चितवत[3] चंद चकोरा ॥ १ ॥
प्रभुजी, तुम दीपक हम बाती ।
जाकी ज्योति बरै[4] दिन राती ॥ २ ॥
प्रभुजी, तुम मोती हम धागा ।
जैसे सोनहि मिलत सुहागा ॥ ३ ॥
प्रभुजी, तुम स्वामी हम दासा ।
ऐसी भक्ति करै रे दासा ॥ ४ ॥

९७

संत परम हितकारी । जगत्‌मांहि । ध्रु० ॥
प्रभुपद प्रगट करावत प्रीती
भरम मिटावत भारी ॥ १ ॥
परम कृपालु सकल जीवन पर
हरिसम सब दुखहारी ॥ २ ॥
त्रिगुणातीत फिरत तन त्यागी
रीत जगत्‌से न्यारी ॥ ३ ॥
ब्रह्मानंद संतन की सोवत
मिलत है प्रकट मुरारी ॥ ४ ॥

---

१ झोपतांना. २ स्वच्छ. ३ चेतना देतो. ४ जळते.

९८

राम सुमिर राम सुमिर राम सुमिर भाई । ध्रु० ॥

नर-तनु यह बार बार । जगमें नही मिलनहार[१] ।
कोई दिनकी बहार । पीछे पछताई ॥ १ ॥

नारी सुत मात तात । चार दिवस की जमात ।
कोई नही संग जात । नरकमें सहाई ॥ २ ॥

धनका क्या करत मान । पंकज[२] जललव समान ।
कर ले कछु करसे दान । बहत नदी जाई ॥ ३ ॥

बारबार राम नाम । भज ले त्यज सकल काम ।
ब्रह्मानंद परमधाम । अंत-काळ पाई ॥ ४ ॥

९९

प्रभु तेरी महिमा किसबिध गाऊं ।
तेरो अंत कहीं नहीं पाऊं ॥ ध्रु० ॥

बेदपार अजहूं नहि पाऊं, मै कैसे बतलावूं[३] ।
अलख निरंजन रूप निहारो, कैसे ध्यान लगावूं ॥ १ ॥

गंगा यमुना नीर बहाये, मज्जन किम करवावूं ।
पांच भूतकी देह न तुमरी, चंदन किम लिपटावूं ॥ २ ॥

वृक्ष बगीचे रचना तेरी, कैसे फूल चढाऊं[४] ।
सकल जगतके पालनकर्ता, कैसे भोग[५] धरावूं ॥ ३ ॥

हाथ जोड कर अरज[६] करूं मै, बारबार सिर नाऊं[७] ।
ब्रह्मानंद हटा दे पडदा, घटिघटि दरसन पाऊं ॥ ४ ॥

---

१ मिळणारी. २ कमळ. ३ वर्णू. ४ अर्पण करूं. ५ नैवेद्य दाखवूं.
६ प्रार्थना. ७ नमवूं.

१००

उठ जाग मुसाफिर भोर भई
अब रैन कहां जो सोवत है ।
जो सोवत हैं सो खोवत है
जो जागत है सो पावत है ॥ १ ॥
टुक[१] नींदसे अखियां खोल जरा,
औ गाफिल रबसे[२] ध्यान लगा ।
यह प्रीत करनकी रीत नही
रब जागत है तू सोवत है ॥ २ ॥
ऐ जान भुगत करनी अपनी
ओ पापि पापमें चैन कहां ।
जब पापकी गठरी सीस[३] धरी
तब सीस पकड क्यों रोवत[४] है ॥ ३ ॥
जो काल करे सो आज कर ले
जो आज करे सो अब कर ले ।
जब चिडियन[५] खेती चुग[६] डाली
फिर पछिताये क्या होवत है ॥ ४ ॥

१०१

प्रेममुदित मनसे कहो राम राम राम । श्रीराम ॥ ध्रु० ॥
पाप कटे दुःख मिटे लेके रामनाम ।
भवसमुद्र सुखद नांव एक रामनाम ॥ १ ॥
परम शांति सुखविधान नित्य रामनाम ।
निराधार को आधार । एक रामनाम ॥ २ ॥
परमगुप्त परम इष्ट मंत्र रामनाम ।
संतहृदय सदा वसत एक रामनाम ॥ ३ ॥

---

१ अल्प. २ ईश्वर. ३ डोकें. ४ रडत. ५ पाखरें. ६ खाली.

महादेव सतत जपत दिव्य रामनाम ।
काम शमत चित्त सधत । कहत रामनाम ॥ ४ ॥
मातापिता बंधु सखा सबहि रामनाम ।
भगत जनन जीवन धन एक रामनाम ॥ ५ ॥

१०२

कृष्ण गोविंद गोपाल गाते चलो ।
मन को विषयों के विषसे हटाते चलो ॥ ध्रु० ॥
देखना इंद्रियों के न घोडे भगे[१] ।
रात दिन उनको संयम के कोडे[२] लगे ।
तन के रथको सुपथ पर चलाते चलो ॥ १ ॥
काम करते रहो नाम जपते रहो ।
मनमें जगदीश का ध्यान धरते रहो ।
नामधन का खजाना बढाते चलो ॥ २ ॥
सुखमें फूलो नही दुखमें तडपो[३] नही ।
प्राण जाये बगर नाम भूलो नही ।
प्रेमश्रद्धा के आसू बहाते चलो ॥ ३ ॥
लोग कहते हैं भगवान् आते नही ।
द्रौपदीकी तरह हम बुलाते नही ।
रुक्मिणी की तरह धुन लगाते चलो ॥ ४ ॥
लोग कहते हैं भगवान् खाते नही ।
भिल्लनीकी तरह हम खिलाते नही ।
शोक प्रेमी विदुरसम जिमाते[४] चलो ॥ ५ ॥
कृष्ण सर्वत्र सबमें सदा बस रहे ।
हम भी नभमें पवन जैसे उसमें वहें ।
ऐसा अनुभव सुधारस पिलाते[५] चलो ॥ ६ ॥

---

१ पळतात. २ चाबूक. ३ तळमळ. ४ खाऊं घालीत. ५ पिववीत.

ख्याल[१] आवेगा उनको कभी ना कभी ।
हमभी पावेंगे उनको कभी ना कभी ।
ऐसा विश्वास मनमें जमाते[२] चलो ॥ ७ ॥

१०३

जय जगदीश हरे ।
भक्त जनोंका संकट छिनमें[३] दूर करे ।
जो ध्यावे फल पावे । दुख विनसे मनका ॥ १ ॥

सुखसंपत्ति गृह आवे । कष्ट मिटे तनका ।
मातापिता तुम मेरे । शरण गहूं किसकी ।
तुमबिन और न दूजा । आस करूं जिसकी ॥ २ ॥

तुम पूरण परमात्मा । तुम अंतर्यामी ।
पारब्रह्म परमेश्वर तुम सबके स्वामी ।
तुम कृपा करुणा के सागर । तुम पालनकर्ता ।
मै मूरख खलकामी । कृपा करो भर्ता ॥ ३ ॥

तुम हो एक अगोचर सबके प्राणपती
किसबिध[४] मिलू[५] गुसांई[६] तुमको मै कुमती ।
दीन-बंधु दुखहर्ता ठाकूर तुम मेरो ।
अपने हाथ उठावो, द्वार पर्यों तेरो ।
विषयविकार मिटाओ । पाप हरो देवा ।
प्रज्ञाभक्ति बढाओ । संतन की सेवा ॥ ४ ॥

---

१ विचार, आठवण. २ दृढ करीत. ३ क्षणांत. ४ कशा तऱ्हेनें. ५ भेटूं. ६ गो-स्वामी.

१०४

वो कहां[१] प्रभु उगम आपरा
अरु[२] कहां तूं मुग्ध[३] गंवारा ॥ ध्रु० ॥
जिस्के गुण रवी सकारे[४] । शशि वायु और सितारे[५] ।
षड् ऋतू और वन सारे । गा गा के नेति पुकारे ।
गये गुजर अनंत महंत योगी । सूर संत, अंत न निकारा[६] ॥ १ ॥
जलपर जमीन ठहराके[७] । अस्मान् अधर लटकाके ।
सब नियमित हुए ठहराके । कइ कोटि कोशसे दूर ।
चमक रहा नूर[८] । हुकमके द्वारा ॥ २ ॥
कहां पर्वत शिखरके ऊपर । कर दिये खडे[९] जहां तरुवर ।
उनको भी वहां निरंतर । पहुंचावत है जीवनझर ।
चोंटीको[१०] तो कनकनका । हस्तिको मनका[११] । देननहारा ॥३॥
क्या अद्भुत खेल बनाया । पथ्थरसे पानी बहाया ।
कांटोंमें फूल समाया । लकडीसे फल निपजाया ।
एक तत्तसे मानव जैसे पुतले कैसे बनाये हजारा ॥ ४ ॥
पृथ्वी यदि पत्र बनावे । सागर दवात हो जावे ।
वनवृक्षकी कलम चलावे । गुण लिखते पार न आवे ।
सब होकर रोम जबान[१२] । करे यदि गान । न लगे शुमारा[१४] ॥५॥

१०५

है बहारे बाग दुनिया चंद[१५] रोज ।
देख लो उस्का तमाशा चंद रोज ॥ १ ॥
ऐ मुसाफिर[१६], कूचका सामान कर ।
इस जहांमें[१७] है बसेरा[१८] चंद रोज ॥ २ ॥

---

१ कोठें. २ आणि. ३ अडाणी गुराखी. ४ गातो. ६ काढला. ७ मांडून. ८ तेज (सूर्य). ९ उभे. १० मुंगी. ११ मणाचें. १२ केस. १३ जीभ. १४ अंदाज. १५ कांहीं. १६ प्रवाशी. १७ जगांत. १८ आसरा.

पूछा लुक्मासे[१] तू जीया कितने रोज ।
दस्ते[२] हजरत मलके बोला ' चंद रोज ' ॥ ३ ॥
बाद[३] मदफन कब्रमें बोली कज़ा[४] ।
अब यहां पे सोते रहना चंद रोज ॥ ४ ॥
फिर कहां तुम और मै कहां ऐ दोस्तों ।
साथ है मेरा तुम्हारा चंद रोज ॥ ५ ॥
क्यों सताते हो दिले बेजुर्म[५] को ।
जालिमो[६] है ये जमाना चंद रोज ॥ ६ ॥
याद कर तूं ऐ नजीर कब्रोंके रोज ।
जिंदगीका[७] है भरोंसा चंद रोज ॥ ७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

१ लुक्मा हाकिम नांवाचा थोर पुरुष. २ स्वारीचे ( आपले ) हात. ३ दफ़न विधी नंतर ४ मृत्यूची देवी. ५ निरपराध्यांचीं मनें. ६ जुलमी लोक ७ आयुष्य.

## पद्य बंगाली

१०६

* अंतर मम विकसित करो
अंतरतर हे ।
निर्मल करो, उज्ज्वल करो, सुंदर करो हे ॥ १ ॥
जाग्रत करो उद्यत करो निर्भय करो हे ।
मंगल करो निरलस निःसंशय करो हे ॥ २ ॥
युक्त करो हे सबार[१] संगे मुक्त करो हे बंध ।
संचार करो सकल कर्मे शांत तोमार[२] छंद ॥ ३ ॥
चरण पडो मम चित्त निष्पंदित[३] करो हे ।
नंदित करो नंदित करो नंदित करो हे ॥ ४ ॥

---

* हें बंगाली पद्य कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांनीं रचलेलें आहे.
१ सर्वांच्या २ तुझ्या ३ निश्चळ.

# पुरवणी पद्यें

१०७

सार संसाराचें । पर-उपकार । त्यावीण असार । सर्व कांहीं ॥ १ ॥
देहा कष्ट होतां । देह रडे रडो । उपकार घडो । निश्चयो हा ॥ २ ॥
मना दुःख होतां । मन रडे रडो । उपकार घडो । निश्चयो हा ॥ ३ ॥
देह दिला देवें । उपकारासाठीं । उपकारासाठीं । दिलें मन ॥ ४ ॥
अल्प शक्ति तरी । अल्प उपकार । थोर तरी थोर । करणेंची ॥ ५ ॥
उपकारीं वेंचा । तनमनधन । मोक्षासी साधन । दुजें नाहीं ॥ ६ ॥

—सेनापति बापट

१०८

चित्त शुद्ध तरी । शत्रु मित्र होती ।
व्याघ्रही न खाती । सर्प तया ॥ १ ॥
विष तें देईल । सकल अमृत-फळ ।
होतील शीतल । अग्निज्वाळा ॥ २ ॥
आवडेल जीवा । जीवाचिये परी ।
सकलां अंतरीं । एक भाव ॥ ३ ॥
तुका म्हणे कृपा । केली नारायणें ।
जाणिजे ते येणें । अनुभवें ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९९७६९
REFBK-0011771
REFBK-0011771

# पद्यांची सूची

[ सूचना—पद्यांपुढील आंकडे पद्यानुक्रमांचे आहेत. ]


अजि म्या ब्रह्म ३०
अब तो प्रकट ८६
अम्हि काय कुणा १९
अम्हि सर्वसुखी ५०
अशाश्वत संग्र० ३१
असो तुला देवा ५५
आणिक दुसरें ८
आनंदें रमुं या ५९
आम्ही देवाचे ५२
आम्ही वैकुंठ १६
इस तन धन ९२
उठ जाग मुसा० १००
एक ज दे चिन० ६६
ऐसें भाग्य कई ६
अंतर मम १०६
अंतर माथी ६९
कलिनाम काम ७९
कल्याण करीं २१
काय वानूं आतां १३
काया ही पंढरी २६
कृष्ण गोविंद १०२
खरा तो एक ५४
गुरु कृपांजन ९५
गुरुबिन कौन ९०
घेइं घेइं माझे ३
चरन कमल ८०
चित्त शुद्ध तरी १०८
जन्ममरणाचीं ५३
जय जगदीश १०३
जय जय राम ४०
जागिये रघुनाथ ७७
जूनू थयुं ने ६८
जे कां रंजले १२
जेथें जातों तेथें २
झिनी झिनी झिनी ८९
ठेविशील तैसे ६०
तू दयालु दीन ७६
तूं माझा यज० ६३
तूं माझी माउली २३
तें मन निष्ठुर २७
दीनन दुख ८२
देव जवाळि २२
देव माझा मी १७
देह असे यंत्र ४७
देह जावो अथ० २४
धाव पाव सा० ४३
धाव रे रामराया २०
न कळतां काय ५
न मिळो खाव० १५
नर तनु व्यर्थ ३९
नरनारी बाळें ७
नाहीं संतपण १४

नियम पाळावे ३६
निरिच्छता दे ३८
पापाची वासना ४
पायोजी मैने ७०
पावन करिं ४१
पांडुरंग श्रीरंग ४२
प्रभुजी तुम ९६
प्रभु तेरी म० ९९
प्रभु माझी जी० ५७
प्रभु मेरी नाव ७५
प्रभु सतत ५६
प्राण जाई दे० १८
प्रेममुदित १०१
प्रेमरसाची ६१
बिसर गयी ९३
बोलूं बोलूं ऐसे २५
ब्रह्मचर्य तें पाळावें ४८
भक्तांचिया काजा० ३२
भक्तीं आकळिला २८
भजो रे भैया ८८
भाव धरा रे २९
मजवरी दया ४५
मन लागो मेरो ८७
माई मैने गोविंद ७३
माझिये जातीचें १०
मेरे तो गिरिधर ७१
मेरे राणाजी मै ७२
मोसम कौन कुटिल ८४
मंगल-मय नाम ५१
मंगल मंदीर ६७
म्हाने चाकर ७४
या भारतांत ४९
रघुवर तुमको ७८
राम सुमिर राम ९८
लाभला महात्मा ४६
विठ्ठल तो आला ४४
विष्णुमय जग ११
वृक्षनसे मत ले ८१
वैर करूं कोणासी ५८
वैष्णव जन तरी ६४
वैष्णव जन तो ६५
वो कहां प्रभु १०४
शांति परतें नाहीं ९
सबसे ऊँची ८५
समझ बूझ मन ९१
सांगड बांधा रे ३७
सार संसाराचें ५१
सुनेरी मैने ८३
सुमरन कर ले ९४
संत पदाची जोड ३३
संत परम हित ९७
स्मरतां नित्य हरि ३४
हरि तुझी आवडी ६२
हरिभजनावीण ३५
है बहारे बाग १०५
होचि दान देगा १

११